पुणे, किशोर–वर्ष ५४, अंक १ ला, जानेवारी २०२५ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.54, Issue 1, January, 2025 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52



# संविधान

देविदास सौदागर

शिकवते प्रेम, सांगते बंधुता
ठेवते समता, संविधान !
खूप मोठी गोष्ट, सर्व समानता
राष्ट्राची एकता, संविधान !

लोकशाही मूल्ये, मनात पेरते!
विश्वास जपते! संविधान!
आम्ही भारतीय हा उल्लेख मोठा!
एकीचा हा साठा, संविधान!

मनातल्या गोष्टी, बोलण्याचा हक्क!
लिहिण्याचा हक्क, संविधान!!
अन्याय सारून, न्याय करते
पोटाशी धरते, संविधान!

माणसास देते, जगण्याची प्रतिष्ठा,
भारतीय निष्ठा, संविधान!
प्रजा हीच राजा, करते हा घोष!
सांभाळते देश, संविधान!

संपर्क : ९१७५५४६५९३



# किशोर

जानेवारी २०२५, वर्ष ५४ वे, अंक १ ला, पौष-माघ, शके १९४७

**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

**निर्मिती अधिकारी :**
हेमंत बाबर

**अक्षरजुळणी :** किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

**वितरण व्यवस्थापक :**
जी. आर. पानसरे

**मुखपृष्ठ**
रेश्मा बर्वे
संपर्क : ९९६०३०४४४१

**चित्रांकन :**
घनश्याम देशमुख, रेश्मा बर्वे, धनश्री केळकर,
राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, योगिता धोटे,
गणेश ढवळे, लोकेश कुलकर्णी, अनुजा सायगांवकर,
बुद्धभूषण लोंढे, माईंडईट संवाद.


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संविधान | देविदास सौदागर | ०२ |
| भिंगोटा | जितेंद्र कुवर | ०६ |
| स्वागत करूया नववर्षाचे | राजेंद्र सोमवंशी | ११ |
| निवतीचा सुंदर समुद्र किनारा | सुहास बारटक्के | १२ |
| नवीन संकल्पाची भाषा | चारुता प्रभुदेसाई | १७ |
| चला चित्र रंगवूया | रेश्मा बर्वे | १९ |
| कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय? | अच्युत गोडबोले | २० |
| चांगले नेटिझन्स बना... | सुधीर साबळे | २२ |
| ऐका कान देऊन | डॉ. नीलिमा गुंडी | २४ |
| तिळगूळ घ्या गोडगोड बोला | सुचिता कुलकर्णी-जोशी | २६ |
| लोकमाता | बबन शिंदे | २७ |
| देश माझा... मी देशाचा | प्रतिमा जगताप | ३१ |
| सरग दिदा पाणी दे पाणी दे | सुनिल तांबे | ३२ |
| संयमाची गोड फळे | हबीब भंडारे | ३५ |
| वाचणारी डोकी हवीत | रामदास केदार | ३६ |
| कुतूहल | वसुंधरा भोपळे | ३८ |

**बालविभाग**

| | | |
|---|---|---|
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा | घनश्याम देशमुख | ४४ |
| बारा महिने | संगीता माने | ४६ |

**ENGLISH SECTION**

| | | |
|---|---|---|
| Play and Enjoy | Chitrarekha Jadhav | ४७ |
| Crying Crops | Varsha Dhoke | ४८ |
| Funny Puzzle | | ५० |



ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

यंदाचा किशोर दिवाळी अंक वाचून खूप आनंद झाला. आम्ही सुट्टीत हा अंक वाचून धमाल केली. यातील कथा, कविता, लेख, चित्रकोडी यातून आम्हांला खूप छान माहिती मिळाली. आम्हांला किशोर खूप खूप आवडला.



**सोनदरा गुरुकुल, डोमरी, ता. पाटोदा, जि. बीड. ४१४२०४**

## मुखपृष्ठाविषयी

आपला भारत देश जगातील सर्वाधिक लहान मुले असलेला देश आहे. देशाच्या प्रजेचा मोठा भाग ही चिमुकली मुले आहेत. हेच उद्याचे जबाबदार नागरिक असतील. आपण आपल्या भारत देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहोत. त्या निमित्ताने देशातील लहानग्यांना सुरक्षित वातावरण, निर्मळ आनंद आणि उज्ज्वल भविष्य लाभेल याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने उचलावी. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे आणि तसं करताना त्यांची मूळची निरागस आणि चौकस वृत्ती अलगदपणे फुलण्यासाठी खेळ, कार्यानुभव, दर्जेदार साहित्य, आनंददायी पुस्तके यांचा भरभरून वापर करावा. त्यातलेच एक 'किशोर'! इथे फक्त मुलांची सत्ता चालते. मुलांना आनंदाचा हा ठेवा भरभरून लुटता यावा त्यासाठी मुलांना धमाल बालपण देण्याचा सगळे मिळून प्रयत्न करूया.

## मुलांसाठी कृती

* मुखपृष्ठावर दिसणाऱ्या चित्रातल्या कोणकोणत्या गोष्टी तुम्हाला करायला आवडतात, येतात किंवा शिकाव्याशा वाटतात याबद्दल तुमच्या मित्र मैत्रिणींना, घरी मोठ्यांना सांगा. त्यांनाही विचारा.
* चित्रातल्या गोष्टी एकमेकांना सांगून शोधण्याचा खेळ मित्र मैत्रिणीबरोबर खेळा.
* चित्रात भारताचे राष्ट्रीय पक्षी, प्राणी, फुल आणि खेळ कुठे दिसतात का शोधा.
* चित्रात प्राणी, पक्षी, खेळणी, खाण्याचे पदार्थ, खेळाचे साहित्य, शाळेत किंवा बागेत दिसणाऱ्या वस्तू कोणत्या आहेत ते शोधा.

# जगातला सगळ्यात लहान वर्ग

हितगुज

सुब्रह्मण्यन् चंद्रशेखर (Subrahmanyan Chandrasekhar) हे भारतीय वंशाचे प्रसिद्ध खगोल भौतिकशास्त्रज्ञ होते. अत्यंत बुद्धिमान आणि अभ्यासू म्हणून त्यांची ख्याती होती. अमेरिकेतील यर्कीस (Yerkes) येथील वेधशाळेत ते संशोधन करीत होते. त्या वेळी शिकागो विद्यापीठाने त्यांना एका वर्गावर शिकवण्याची विनंती केली. त्यांनी ती आनंदाने मान्य केली. पण झाले असे की, त्या वर्गात फक्त दोनच मुलांनी प्रवेश घेतला. वेधशाळा ते शिकागो येण्याजाण्याचे अंतर २४० किमी होते. फक्त दोन मुलांना शिकवण्यासाठी त्यांना एवढा प्रवास करावा लागायचा. सर्व सहकारी त्यांना हसायचे. कारण वर्गात जेवढी जास्त मुले, तेवढा तो वर्ग आणि शिक्षक प्रसिद्ध असे मानले जायचे. मात्र केवळ दोनच विद्यार्थी असल्याने शिकागो विद्यापीठात हा वर्ग चेष्टेचा विषय ठरला. 'जगातला सगळ्यात लहान वर्ग' अशी त्याची हेटाळणीही झाली. अपयशी शिक्षक म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले. मात्र चंद्रशेखर यांची निष्ठा अजिबात ढळली नाही. ते अत्यंत आनंदाने त्या दोन मुलांना शिकवत राहिले. टीकाकारांकडे दुर्लक्ष करीत अभ्यासाचा आणि शिकवण्याचा पुरेपूर आनंद घेत राहिले. त्या दोन मुलांसाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. ती दोन्ही मुलेपण तितकीच जिद्दी होती. आपल्या शिक्षकाचे कष्ट त्यांना दिसत होते. त्यांनीही स्वतःला अभ्यास आणि संशोधनात वाहून घेतले. विशेष म्हणजे त्या दोन्ही मुलांनी विज्ञानाच्या क्षेत्रातील सर्वोच्च असे नोबेल पारितोषिक मिळवले. हे कमी होते की काय, म्हणून पुढे गुरूला म्हणजे चंद्रशेखर यांना देखील नोबेल देऊन सन्मानित करण्यात आले. म्हणजे 'जगातील सर्वात लहान वर्ग' म्हणून विनोदाचा विषय झालेला वर्ग, हा विद्यापीठाच्या इतिहासातील सर्वात यशस्वी वर्ग ठरला; ज्यातील शिक्षकाने व सर्व विद्यार्थ्यांनी नोबेल पारितोषकावर आपले नाव कोरले.

लोक हसतात तर हसू द्या. त्याकडे दुर्लक्ष करत आपले सर्वस्व पणाला लावत जेवढे आहेत तेवढ्या विद्यार्थ्यांना पूर्णपणे घडवणे हे प्रत्येक शिक्षकाचे कर्तव्य आहे. सोबतच आपल्यासाठी जीवाचं रान करणाऱ्या शिक्षकाचा त्याग लक्षात घेऊन मन लावून अभ्यास करणे ही विद्यार्थ्यांचीही जबाबदारी आहे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांची एकमेकांबद्दल अशी समर्पणाची भावना असेल तर नक्की इतिहास घडतो. गुरु-शिष्यांची अशी लोभस उदाहरणे आपल्याला निश्चित प्रेरणा देतात. ध्येयाने प्रेरित झालेले असे शिक्षक आणि विद्यार्थी हे जग सुंदर बनवतात.

नवीन वर्षाच्या निमित्ताने मी असा शिक्षक/विद्यार्थी होईन हा संकल्प करूया.



**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**

# भिंगोटा

जितेंद्र कुवर

शाळा सुटताच आम्ही भुंगा पकडायला जात असू. खरंतर शाळेतनं येताना गवताड्याच्या जागेचा आम्ही रस्त्यातनं अंदाज घेत असू की आज कुठे भुंगे पकडायचे? मग घरी जाऊन दप्तर फेकायचं, थोडेफार जेवण करायचं नाहीतर शेंगदाणे, गूळ खोबरे यांपैकी जे हाती येईल त्याचा तोंडात बकाना भरून धूम पळत सुटायचे ते थेट गवताड्यावर. गवताडं म्हणजे गवत उगवलेली पाणथळ जागा. तिथं वेगवेगळी झुडपं उगवलेली असायची. त्यातल्या त्यात तिथं तणकट अन् गवत जास्त असायचं आणि आम्ही 'लांडगा' म्हणून एकमेकांना मारून फेकायचो अशी गारगोटीच्या आकाराची फळं येणारी झुडपंपण खूप होती. लपाछपी खेळताना ह्या झुडपांत आम्ही लपत असू. या झुडपांत बऱ्याच वेळा आम्ही साप पाहिले होते. म्हणजे तिथं एकट्याला लपणं अवघड असे. ह्या झुडपांत पावसाळ्यात तऱ्हेतऱ्हेचे भिंगं सापडत. अंगावर निरनिराळे रंग असलेले, काही ठिपक्या ठिपक्यांचे. त्यातले हिरव्या रंगाचे व पांढऱ्या ठिपक्यांचे भिंगं मला फार आवडत. भिंगं पकडत फिरणे आमचा नेहमीचा शिरस्ता होता. पक्या भिंग पकडण्यात पटाईत होता. कोणताही भिंगं असू द्या पक्याने ठरवलं तर धरला म्हणून समजा. पण गवताड्यातल्या गाळात पक्या आणि यशा एकदा पडले होते. त्याचं असं झालं की दिवाळीच्या सुट्ट्या लागलेल्या. पाऊस उघडलेला. गवताडं फार वाढलेलं अन् गवताड्याच्या  मध्यभागी असलेल्या खड्ड्यात पावसाचे पाणी साचून छोटं तळं तयार झालेलं. त्या तळ्यात गावातली कुत्री, भटकी जनावरं येऊन बसत. येणाऱ्या जाणाऱ्या ढोरक्यांच्या म्हशी



कधीमधी त्या तळ्यातल्या गाळात बसत असत. नोव्हेंबर महिन्यातली गोष्ट. एकदा काही म्हशी गवताड्यातल्या या पाण्यात बसलेल्या. ढोरके लांब लिंबाखाली. काही पोरं भिंग पकडायला म्हणून गवताड्यात घुसली, तोच त्यांच्यातील एक मुलगा भिंगामागे पळता पळता चुकून म्हशीला जाऊन धडकला. म्हैस बसलेली. एकाएकी काय आदळलं म्हणून ती उठली. त्या सरशी इतरही काही म्हशी उठल्या आणि जोरजोरात हंबरत पळू लागल्या. पळता पळता त्यांनी माना झटकल्या. त्यातल्या एका म्हशीचा झटका यशाला बसला. मानेचा झटका बसल्याक्षणी यशा वर उडाला गेला आणि गाळात आपटला. आम्हां पोरांना वाटलं की, यशाने उडी मारली. पक्या घाबरला. तो पळत सुटला अन् गाळात घसरत जाऊन यशाजवळ पोहोचला. म्हशी सैरभैर झालेल्या पाहून ढोरके पळत सुटले. म्हशी थेट गल्लीतनं दिसेनाशा झाल्या. ढोरके त्यांच्या मागनं. आम्ही गवत बाजूला सारत यशाकडे. यशा अन् पक्या गाळात बसलेले. कण्हत होते. त्यांना चांगलाच मुका मार लागलेला. आम्ही हात देऊन त्या दोघांना गाळातनं उठवलं. बाहेर काढलं. ते दोघं पुरते गाळाने भरलेले. दोघांच्या कमरेला आणि पायाला लागलेलं. असा हा भिंगाचा प्रताप. भिंगाबाबतची खरी गोष्ट तर पुढेच आहे.

पक्या भिंगे पकडण्यात पटाईत असल्याने त्याच्याकडे काडेपेटीत खूप सारे भिंगं होते. त्याने एक दिवस त्याच्या जवळच्या सर्व काडेपेट्या आम्हांला दाखवायला आणलेल्या. दहा-बारा असतील. हळूहळू काडेपेटीचं झाकण उघडून पक्या आतला भिंगे दाखवी. झाकण फारच थोडं थोडं उघडावं लागे. नाहीतर भिंगे उडून जाण्याची भीती असे. भिंगाला खायला पक्या लिंबाच्या पिवळ्या लिंबोळ्या टाकत असे. लिंबोळ्या टाकण्याचा एक फायदा म्हणजे त्या चिकट असल्याने पेटीतली भिंगाची हालचाल फार कमी होई. पक्याकडचे भिंगे पाहून आमचे डोळे दिपले. वेगवेगळ्या रंगाचे अन् आकाराचे भिंगे पाहून आम्ही चक्रावलो. भिंगांवरनं आमचं बोलणं सुरू झालं. इतके भिंगे कसे पाळतो? त्यांना खाऊ पिऊ काय लागतं? तुला कसं समजतं की भिंगाला भूक लागली म्हणून? असे चित्रविचित्र प्रश्न आम्ही पक्याला विचारले. तो पण भलती फुशारकी मारत उत्तरं देत होता. त्यातली बरीच उत्तरं म्हणजे निव्वळ बाता होत्या. हे त्याला आणि आम्हांलाही कळत होतं पण काय करणार? त्याच्या एवढे भिंग किंवा त्याहून निम्मेही भिंग आमच्या सगळ्यांचे मिळून होत नव्हते. आम्ही गुपचूप ऐकून घेतलं. पक्या जेव्हा खूप बढाया मारायला लागला तेव्हा आम्ही सारे उठलो आणि तिथून निघून गेलो. घराजवळ येताच शशाने मला हात पुढे करायला सांगितलं. मी का म्हणून विचारलं तर तो म्हणाला की, ''तुला काय करायचं हात पुढे करायला सांगितलं तर पुढे करायचा बास.'' त्याच्या या बोलण्याने मी माझा उजवा हात पुढे केला. त्यानं खिशातून काहीतरी काढलं आणि माझ्या हातावर ठेवलं. ती एक काडेपेटी होती.

मी चमकलोच. शशाकडं पाहत बोललो, ''काय आहे हे?''

शशा बोलला, ''तूच बघ.''

मी काडेपेटी हातात घेतली आणि बघू लागलो.

''उघड आता'', शशा बोलला.

मी काडेपेटी उघडू लागलो.

''पुरी नको उघडू'', शशाने सांगितलं.

तशी मी काडेपेटी थोडीच उघडली तर त्यात लिंबोळी आणि भिंग.

''शशा... भिंग?'' मी आश्चर्याने शशाला विचारलं.

शशा फुशारकीनं, ''तर मग भिंग काय पक्याकडेच असतात काय?''

मी चाटच पडलो.

''अरे, पण कधी पकडला हा भिंग तू?''

''ते सिक्रेट असतं'', शशा मला टाळत बोलला.

''सिक्रेट कसलं त्यात? आता काही वेळापूर्वी तर तू सांगत होता की तुझ्याकडे एक बी भिंग नाही म्हणून. मग हा भिंग कसा काय आला तुझ्याकडं?''

''मी सांगत होतो थोड्या वेळापूर्वी... पण आता

नाही. आता माझ्याकडे एक आहे.''

मला शशाचा संशय आला.

''तू पक्याचा भिंग ढापला का?''

त्यावर शशा वरमला.

मी पुन्हा विचारलं, ''पक्याचा भिंग आहे ना?''

शेवटी तो बोलला, ''पक्याचाच आहे. मी मारला. लई शहाणा बनत होता तो पक्या म्हणून मी मारला भिंग. पण त्याला सांगू नको. आपल्यातल्या आपल्यात राहू दे.''

मीपण गप्प झालो. तसं पक्याच्या फुशारक्या मला आवडल्या नव्हत्या. पण मला आनंद झाला होता. 'जाऊ दे पक्याला असलीच अद्दल पाहिजे.' म्हणून मी गप राहण्याचं, कोणाला न सांगण्याचं वचन शशाला दिलं आणि आम्ही दोघं आपआपल्या घरी निघून गेलो. भिंगाची गोष्ट सुरू झाली ती इथं.

शशाने भिंग कोनाड्यात ठेवला. भिंगं ठेवला म्हणजे भिंगे असलेली काडीपेटी. लोडशेडिंगमुळे रात्री उशिरा लाईट येई. म्हणून साऱ्या गावात जुन्या पद्धतीचे कंदिलं, चिमण्या लावत. रस्त्यानं जाताना काही जण सेलच्या बॅटऱ्या वापरीत. संध्याकाळ झाली. नित्यनेमानं शशाच्या मायनं कंदील काढला. त्याची पूसपास केली अन् काडेपेटी शोधू लागली. तिनं कोनाड्यात हात टाकला. तिला काडीपेटी सापडली. काडेपेटी उघडली पण त्यात काड्या नव्हत्या. त्यामुळे तिनं काडेपेटी परत कोनाड्यात फेकून दिली आणि चुलीकडे गेली. तिथली काडेपेटी आणून कंदील पेटवला. कोनाड्यात काडीपेटी फेकताना ती काडेपेटी उघडी राहिली होती. त्यामुळे भिंगाचं नशीब फळफळलं होतं. भिंग हळूहळू काडेपेटीच्या बाहेर आला आणि भिंतीवरनं खाली उतरू लागला. गृहपाठ करत बसल्यामुळे शशाला भिंगाची आठवण पडली. गृहपाठ केल्यानंतर जेवणं आवरली. त्यानंतर शशाला एकदम काडेपेटी आणि भिंगाची आठवण झाली. काडेपेटी कोनाड्यात आहे की नाही याकरिता कोनाड्यात त्यानं हात टाकला. त्याच्या हाती काडीपेटी लागली पण त्याने ती तिथेच राहू दिली. कारण कोणी पाहिलं असतं तर घरात काडेपेटी आणि भिंगाबद्दल कळलं असतं आणि त्याला बोलणी खावी लागली असती. त्यानं फक्त काडीपेटी जागेवर आहे की नाही याचा अंदाज घेतला आणि तो झोपायला निघून गेला. लाईट अजून आली नव्हती. साधारण दहा साडेदहाची वेळ झालेली. घरातले सारेच अंथरूण करून झोपी गेलेले. भिंगाचे मार्गक्रमण सुरू झालेलं. तो भिंतीवरून उतरून जमिनीकडे जात होता. थोड्याच वेळात तो जमिनीवर पोहोचला. जमिनीवरनं पहिल्यांदा शशाचा धाकला भाऊ झोपला होता. त्याच्या अंगावर तो चढला. त्यानंतर त्याच्या अंगावरून उतरून हळूहळू पलीकडे गेला. पलीकडे शशा झोपलेला. शशाच्या अंगावरनं भिंग उतरून हळूहळू पलीकडे सरकला. आता शशाच्या आजीचा नंबर होता. भिंग आजीच्या हातावर चढला. भिंग हातावर असताना आजीनं झोपेत एकाएकी तिचा हात डोक्याजवळ घेतला. आता भिंग आजीच्या डोक्यावर आलेला. डोक्यावरनं तो खाली सरकू लागला. कानाजवळ आला अन् कानात उतरला.

हळूहळू भिंगानं बीळ समजून आजीच्या कानात प्रवेश केला. आजी गाढ झोपेत होती. थोड्या वेळाने सवयीप्रमाणे आजीला जाग आली. तिला रात्री एक दोन वेळा पाणी पिण्याची सवय होती. त्यामुळे ती पाणी पिण्याकरता उठली. कोनाड्यातला कंदील बारीक वातीनं जळत होता. त्या प्रकाशाचा आधार घेत आजी रांजणापर्यंत पोहोचली. रांजणातून हलकेच पाणी घेतलं. दोन घोट पाणी प्यायली. उरलेलं पाणी फेकण्याकरता तिनं दरवाजा उघडला अन् ती मागच्या बाजूला आली. त्या वेळी भिंगानं डाव साधला. भिंग आजीच्या कानात जोरात चावला. आजीला असह्य वेदना झाली. कानात कळ उठली तशी आजी ओरडली. वेदनेनं तिला काही उमजेना. तिने सरळ ओट्यावरून अंगणात उडी घेतली. समोर गल्लीत लिंबाखाली तीन-चार जण शेकोटी पेटवून गप्पा छाटत बसले होते. आवाज ऐकून ते चमकले आणि त्यांनी समोर पाहिले तेव्हा आजीने उडी मारली होती. सर्वत्र अंधार होता. फक्त शेकोटीचा अंधूक प्रकाश पसरलेला. त्या अंधूक प्रकाशात आजीला ओट्यावरून ओरडून उडी मारताना शेकोटी जवळच्या लोकांनी पाहिलं. आजीचे विस्कटलेले केस

आणि एकूण हावभावाने ही मंडळी घाबरली. अमावस्येची रात्र असल्याने कोणा हडळीनं उडी मारली की काय अशी शंका त्यांना आली अन् एकदम त्यातला एकाने 'हडळ... संप्याच्या घरात हडळ.... पळा पळा.' असा आरडा केला. मग शेकोटी जवळची मंडळी ओरडत वाट फुटेल तिकडं पळत सुटली. गल्लीतले कुत्रे दचकले. भुंकत पळणाऱ्यांमागे धावू लागले. गल्लीत अचानक आरडाओरडा अन् कुत्र्यांचं भुंकणं ऐकून आजूबाजूच्या घरांतली माणसं जागी झाली, हळूहळू घराबाहेर आली अन् गल्लीत जमू लागली. कोणालाच काय झालं ते कळेना पण आवाज साऱ्यांनीच ऐकलेला. म्हणून जो तो सावध झालेला अन् घोळक्या घोळक्याने आवाज येतोय त्या दिशेने पहिल्यांदा चालत नंतर पळू लागलेला.

आजी मात्र गल्लीत बेशुद्ध पडलेली. अंधारात तिच्याकडे कोणाचंच लक्ष गेलं नाही. शेकोटीवाली मंडळी पळत पळत खळवाडीपर्यंत पोहोचलेली. पळता पळता मंडळींनी 'हडळ, पळा हडळ' अशी ओरड चालवलेली. खळवाडीपाशी एक टेम्पो उभा होता. हा तोच टेम्पो होता जो या आजूबाजूच्या गावांतल्या शिवारात अन् खळवाडीत अचानक येऊन थांबे. कधी कोणी हटकलं तर पंक्चर झालंय अशी बतावणी करी अन् मध्यरात्री चोऱ्या करून चोरीचा माल टेम्पोत घालून पसार होई. पाचेक जणांच्या या टोळक्याने याआधी तीन चार गावांत असल्या चोऱ्या केलेल्या. पेपरात त्याच्या बातम्या छापून आलेल्या. पोलीस बी त्यांच्या पाळतीवर होते. शेकोटीवाली मंडळी एव्हाना टेम्पोपाशी पोहोचली होती. टेम्पोत आधीच तिघे दबा धरून बसलेले. उरलेले दोघे जण केबिनमध्ये. आरडाओरडा ऐकून टेम्पोवाले दचकले. त्यांना वाटलं की आपलं बिंग फुटलंय आणि सारा गाव जागा होऊन आपल्याला पकडायला येतोय. त्यामुळे ड्रायव्हर गडबडला आणि त्यानं घाईघाईत टेम्पो सुरू केला. टेम्पो सुरू होताच शेकोटीवाल्या मंडळींपैकी दोघे जण टेम्पोला लटकले.

हडळीपासून जीव वाचवायला यापेक्षा अधिक चांगली संधी मिळाली नसती. टेम्पोबरोबर कुठेतरी निघून जाणं बरं होतं. कसेबसे ते दोघं टेम्पोत चढले. टेम्पोत आधीच तिघे जण बसलेले त्यात या दोघांची भर पडली. त्यांच्या टेम्पोत येण्याने आवाज झाला अन् टेम्पोतले बिचकले. आत एकच गोंगाट सुरू झाला. मागच्या बाजूला आत एकाएकी सुरू झालेला गोंगाट ऐकून टेम्पोचा ड्रायव्हर पण बिथरला. मुख्य रस्ता सोडून त्यानं टेम्पो अंधारात घातला. आता थेट तो तळ्याकडे निघाला होता. उरलेले शेकोटीवाले टेम्पोमागं पळत होते अन् त्या मागं सारा गाव अशी वरात तळ्याकडं निघाली. तळ्यात अमावस्येच्या तिथीला तीन मांत्रिक जादूटोणा मंत्रतंत्र करत बसलेले होते. त्यांनी चित्रविचित्र कपडे घातलेले. अंगभर राख फासलेली. तांत्रिक विद्येची सारी सामग्री मांडून ठेवलेली होती. ते त्यांच्या वेगळ्याच दुनियेत हरवलेले होते आणि अचानक टेम्पोचा प्रकाश त्यांच्यावर पडला. या अनपेक्षित प्रकाशानं मांत्रिक मंडळी हडबडली. त्यांनी पाहिलं तर टेम्पो त्यांच्याच दिशेने येत होता. कदाचित गावाला आपल्या ह्या खोट्या तंत्रमंत्र विद्येचा सुगावा लागला आणि गावकरी आपल्याला मारायला येत आहेत याची त्यांना खात्री पटली आणि तो मोठा जमाव, त्याचा आरडाओरडा ऐकताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता तंत्रमंत्राची सारी जंत्री तिथंच टाकली अन् तळ्याच्या डाव्या बाजूच्या कच्च्या रस्त्याकडे धूम ठोकली. टेम्पो चालक आता त्यांच्या पाठी. टेम्पोपाठी उरलेले शेकोटीवाले आणि त्यांच्या पाठी सारा गाव. अशी सारी जत्रा आता तळ्याच्या डाव्या बाजूला असलेल्या कच्च्या रस्त्यावर आली आणि तिथून पुढे निघाली. अमावस्येच्या रात्री प्रकाश तेवढा टेम्पोच्या लाईटचा होता बाकी सर्वत्र अंधार. रस्त्यावरनं जाता जाता डाव्या आणि उजव्या बाजूची उभ्या पिकांची वावरं मागे जात होती. अशाच एका वावरात अमावस्येच्या अंधाराचा फायदा घेत कणीस चोरणारी एक दहा-बारा जणांची टोळी येऊन थांबलेली. त्यांचं कणसं चोरीचं काम सुरू होतं. अर्धेअधिक शेत त्यांनी साफ केलेलं. हा कालवा ऐकून मंडळी आहे त्या ठिकाणी कणसांत लपली. त्यांची कुजबूज सुरू झाली. त्यांना वाटलं गाववाल्यांना आपण

आल्याची खबर झालीय. म्हणून आता आख्खा गाव बॅटरी घेऊन इकडे येत आहे. म्हणून ती मंडळी भेदरली. हातातले विळे आणि कापणीची साधनं तिथंच टाकून उभ्या पिकातनं पळत सुटली. कणसांतनं पळता येत नाही हे त्यांच्या ध्यानात येताच ती पलीकडल्या बरडावर घुसली.

बरडावर खालच्या बाजूला नाला वाहत होता. त्याच्या काठी हातभट्टीवाल्यांनी नुकतीच हातभट्टी पेटवली होती. पोलिसांनी जंग जंग पछाडलं होतं पण ही हातभट्टीवाली गँग त्यांच्या हाती कधीच आली नव्हती. कारण हर वक्ताला ते भट्टी लावायची जागा बदलत. त्यामुळे त्यांचा मागोवा घेणं पोलिसांना अवघड जात होतं. माणसं पळत येत असल्याचा सुगावा त्यांना लागला. त्यासरशी ती दक्ष झाली. त्यांनी ताडलं कदाचित पोलिसांची रेड असावी. पोलीस रेडची शंका येताच हातातलं सारं सामान तिथल्या तिथंच खाली टाकून अन् हातभट्टी तशीच जळती ठेवून ती गँग पळत सुटली. नाल्यातनं अंधारात पळणं अवघड जाईल म्हणून ती रस्त्याच्या दिशेने निघाली. रस्त्यावरून खालच्या बारीकडे जाऊ अन् बारीच्या खोबदारीत कुठेतरी लपून बसू असा त्यांचा डाव. एव्हाना कणसावाली टोळी लगबग त्यांच्याजवळ आलेली. अंधारात काहीच दिसत नव्हतं. नुसते पळण्याचे आवाज येत होते. हातभट्टीवाले पुढे अन् आता कणसावाले मागे अशी वरात सुरू झाली. हातभट्टीवाल्यांमुळे कणसावाली टोळी नाल्याकडे न जाता रस्त्यावर आली आणि त्यांच्या मागून पळू लागली. एव्हाना टेम्पो रस्त्याने फार पुढे जाऊन बारीत पोहोचला होता. तिथे गस्तीसाठी आलेल्या पोलिसांनी टेम्पो अडवला होता. त्यातल्या चोरीच्या मालाला अन् पाच जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. उरलेले दोघं म्हणजे पोलीस पाटील अन् रघ्या होते. त्यांची ओळख पटली होती. त्यामुळे त्या दोघांना अटक झाली नाही.

बाकीच्यांना पोलीस व्हॅनमध्ये बसवले होते. पोलीस पाटील हडळीची कथा पोलिसांना ऐकवत होते. पोलिसांना तपासणीसाठी त्या बारीमध्ये अजून दोनेक तास थांबणं गरजेचं होतं. त्यामुळे ते हडळीची कहाणी ऐकून घेत होते. पळता पळता हातभट्टी वाली गँग बारीत घुसली आणि पोलिसांच्या हाती अलगद सापडली. त्यांची रवानगी लगेच पोलिसव्हॅनमध्ये झाली. त्यानंतर कणसावाली टोळी आणि नंतर तीन मांत्रिक बारीत येऊन धडकले. अटक करून त्यांची रवानगी व्हॅनमध्ये करण्यात आली. सरतेशेवटी सारा गाव पोलिसांपर्यंत पोहोचला. पोलीस आणि पोलीस व्हॅनमधली चित्रविचित्र मंडळी पाहून गाववाले बुचकळ्यात पडले. सारा पट उलगडल्यावर मंडळी खोखो हसू लागली. आज एकाच फटक्यात पोलिसांनी परिसरातले सर्व अट्टल गुन्हेगार जेरबंद केले होते. खूप दिवसांपासून पोलीस या साऱ्यांच्याच मागावर होते. हाती आली नाही ती तेवढी हडळ. तसं शेकोटीवाल्यांच्या दृष्टीने हडळ असलेली आजी अंगणात बेशुद्ध होऊन पडलेली अन् ज्यामुळे हे सारं नाट्य घडलं तो भिंगोटा आजीच्या कानातून हळूच बाहेर आला होता अन् अमावस्येच्या चांदण्यात अंगणातून तुरुतुरु चालत जात होता.

**संपर्क : ७७७६९८४०२८**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नं. १ ते १०, ई-१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Printplus Private Limited, G1 to G10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka-Bhiwandi, Dist-Thane 421311 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004.**
*** Editor - Krishnakumar Patil.**



राजेंद्र सोमवंशी

# स्वागत करूया नववर्षाचे

नव्या कल्पना
नव्या योजना,
संकल्पांचे
चला चला रे
स्वागत करूया नववर्षाचे..

मनात सुंदर स्वप्न हवे
जिंकू या चल शिखर नवे,
आळस झटकून दिवस शोधूया चैतन्याचे..
चला चला रे
स्वागत करूया नववर्षाचे..

निसर्ग देतो तुम्हांस ज्ञान
झाड नव्याने सजते छान
तेच बघूनी जगणे व्हावे आनंदाचे...
चला चला रे
स्वागत करूया नववर्षाचे..

दु:खामध्ये धावून जा
इतरांचा आधार बना
प्रतीक असावे हेच तुमच्या सामर्थ्याचे
चला चला रे
स्वागत करूया नववर्षाचे..

माता–पिता बंधू–सखा
प्रत्येकाचे प्रेम जपा
जगास वाटू प्रेम असे हे मानवतेचे
चला चला रे
स्वागत करूया नववर्षाचे...

संपर्क : ९८२३०१७९७७

# निवतीचा सुंदर समुद्रकिनारा

भाग १

सुहास बारटक्के

कोकणात वेंगुर्ले तालुक्यातील निवती गावाजवळच्या समुद्रात प्रचंड आकाराची मोठमोठी दगडी बेटं आहेत. किनाऱ्यापासून थोडं दूर खोल समुद्रात, ही विशालकाय खडकांची रांग आहे. यांनाच 'वेंगुर्ला रॉक्स' किंवा 'निवतीचे खडक' म्हणतात. सुमारे शंभर वर्षांपूर्वी इथं ब्रिटिशांनी बोटींना मार्गदर्शन करण्यासाठी दीपगृहे बांधली. खूपच दूरवर असलेल्या एका खडकाळ बेटावरील शंभर वर्षांपूर्वीचे जुने दीपगृह काळाच्या ओघात नष्ट झाल्याने जवळच असलेल्या दुसऱ्या खडकाळ बेटावर नवे दीपगृह उभारले गेले. जुने दीपगृह असलेले बेट आता ओस पडले..

या जुन्या बेटावर मग कुणी आक्रमण केले? समुद्रमार्गे बाहेरच्या देशातून–भागातून या बेटावर काही लोक रात्रीच्या वेळी गुपचूप कशासाठी येत? तिथं कसली तस्करी (स्मगलिंग) चालायची? ती उजेडात आणणारी ती दोन साहसी मुले कोण? काय रहस्य आहे 'वेंगुर्ला रॉक्स' चे?... त्यासाठी तुम्ही सुहास बारटक्के यांची क्रमशः प्रसिद्ध होणारी 'वेंगुर्ला रॉक्सचे रहस्य' ही कादंबरी आवर्जून वाचा.






कोकणात समुद्रकिनारी अतिशय सुंदर निसर्गरम्य अशी छोटी छोटी गावं आहेत. त्यातलंच एक वेंगुर्ला तालुक्यातलं 'निवती' नावाचं छोटसं गाव. गावाच्या मधून जाणारा चढ उताराचा रस्ता आणि त्याकडेला दोन्ही बाजूंनी कौलारू घरांची रांग. काही घरांमागे नारळी पोफळीच्या हिरव्यागार बागा, रहाट लावलेली पाण्याची विहिर आणि बागेच्या मागच्या बाजूला पांढऱ्या शुभ्र वाळूचा विस्तीर्ण असा चंद्राकृती देखणा सागर किणारा... या किनाऱ्यालाच 'निवतीचा बीच' असं म्हणतात. काहीशा चढ उताराच्या जमिनीवर वरच्या बाजूला निवती गाव वसलंय तर समुद्राच्या अगदी लगत जी झोपडीवजा घरं आहेत ती मासेमारी करणाऱ्या कोळी लोकांची. या मच्छिमार समाजातील पुरुषांचा दिनक्रम ठरलेलाच असतो. पहाटे उठून मासेमारी करण्यासाठी होड्या समुद्रात लोटायच्या. समुद्रात थोडं आत जाऊन जाळी बांधायची. छोट्या माशांचा कळप समुद्राच्या पाण्याच्या पृष्ठभागावर फिरताना आढळला तर वरच्यावर जाळं फेकूनही मासे पकडायचे. दुपार झाली की होडीतच जेवणाचा डबा खायचा आणि समुद्रात खालपर्यंत सोडलेली जाळी वर ओढायला सुरुवात करायची. तासा-दोन तासांत जाळ्यात अडकलेले मासे टोपलीत गोळा करायचे आणि किनाऱ्यावर परत यायचं. टोपलीमधलं सारं धन किनाऱ्यावर आणून ओतायचं, मग माशांची विक्री आणि टोपल्यांची ने-आण करायची ती घरच्या स्त्रियांनी; हा या मासेमारी करणाऱ्या मच्छिमार समाजाचा नेहमीचा दिनक्रम.

कोळ्यांच्या वस्तीच्या अगदी जवळच समुद्र किनारा असल्याने उसळणाऱ्या लाटांचा गंभीर आवाज दिवसरात्र कानात घुमतो. हवाहवासा वाटतो. त्यालाच समुद्राची 'गाज' असं म्हणतात. समुद्राला कितीही भरती आली तरी समुद्र नेहमीच मर्यादा पाळत असल्याने तो या मच्छिमार लोकांच्या वस्तीवर कधीच आक्रमण करीत नाही. त्यामुळेच निवतीच्या किनाऱ्यावरच्या मच्छिमारांच्या घरांना कधीही धोका निर्माण झाला नाही.

या घरांच्या रांगेतच 'बाबूल'चं छोटंसं घर होतं. घर छोटं असलं तरी स्वच्छ आणि नीटनेटकं होतं. घरावर दूरदर्शनची छत्रीपण लावली होती. बोटी समुद्रातून परत येईपर्यंत घरच्या स्त्रिया व मुलांना टीव्ही हाच विरंगुळा होता. तसं बाबूलचं खरं नाव 'श्याम' असं होतं. परंतु निवती गावातले सर्व जण त्याला बाबूलच म्हणायचे. बाबूलचं बालपण समुद्राची गाज ऐकत पांढऱ्या शुभ्र वाळूत खेळण्यातच गेलं.

गावातल्या शाळेत इयत्ता सातवीत शिकणारा बाबूल हळूहळू वडलांना मासेमारीसाठी मदत करायला जाऊ लागला. शाळा मात्र त्यानं कधीच चुकवली नाही. आपल्या मुलानं शहरात जाऊन खूप शिकावं असं त्याच्या वडलांना वाटे. म्हणूनच बाबूल अभ्यासही मन लावून करायचा. एक हुशार आणि चाणाक्ष मुलगा म्हणूनच शाळेत त्याला सारे ओळखत. लहानपणापासूनच समुद्राच्या लाटांशी खेळायची सवय लागल्याने बाबूल उत्तम पोहायचा. हल्ली तो छोटं होडकं घेऊन वल्ही मारीत समुद्रात जवळच्या अंतरावर एकटाही जाऊ लागला होता. म्हणायचा- 'आम्ही तर सागरपुत्र. आम्हांला कसली आली सागराची भिती? समुद्र आम्हांला पित्यासमान आहे.' कधी कधी तो आपल्या सवंगड्यांना घेऊनही समुद्रात जाऊ लागला.

याच बाबूलची हल्ली घट्ट मैत्री जमली होती ती सुट्टीत गावी येणाऱ्या पुण्याच्या 'नील' नावाच्या मुलाशी! नील पुण्यातल्या एका सुप्रसिद्ध शाळेत नववीत शिकत होता. दिवाळीची किंवा मे महिन्याची सुट्टी पडली की निवती गावात राहणाऱ्या आपल्या आजी-आजोबांकडे धावायचा. त्याला निवती गाव

आणि हा निवतीचा समुद्रकिनारा तर खूप आवडायचाच पण सर्वात जास्त आवडायचा तो सागरपुत्र बाबूल. गेली दोन वर्षे गावात 'नील व बाबूलची मैत्री' हा कौतुकाचा विषय होता. आजोळी आलेला नील अगदी सुट्टी संपेपर्यंत निवती गावात राहायचा. बाबूलची भेट व त्याची निवतीच्या त्या किनाऱ्यावरच  झाली होती. पहिल्याच भेटीत त्या दोघांचे सूर जुळले आणि मैत्री पक्की झाली. मग नील बाबूलच्या घरी आणि बाबूल नीलच्या घरी वारंवार ये जा करू लागले. सुट्टी संपली की नील बसने पुण्याला जायला निघायचा. त्याला निरोप देताना बाबूलच्या डोळ्यांत पाणी तरळायचं.

''नील लवकर परत ये हं.... आणि येताना तुझा तो नवा लॅपटॉप घेऊन ये. मला शिकायचं.''

''नक्की येईन लॅपटॉप घेऊन. पुढच्या वेळी मज्जा करू.'' एसटीची बस सुटायची आणि बाबूल उगीचच बसमागे थोडं धावायचा.

नील परत आला की दोघं पुन्हा एकत्र यायचे. नील बाबूलला पुण्यातल्या शाळेतल्या अनेक गमतीजमती सांगायचा. वेगवेगळे प्रयोग करून दाखवायचा. त्यानं आणलेल्या छोट्या लॅपटॉपवर असलेला माहितीचा खजिना उघडून दाखवायचार तर बाबूल त्याला गावातल्या 'गजाली' म्हणजे गमतीशीर गोष्टी ऐकवायचा. नीलला समुद्राच्या लाटांशी खेळायला शिकवायचा. नीलला त्यानं समुद्रात पोहायलाही शिकवलं. मग एक-दोनदा नीलला घेऊन बाबूल होडीनं समुद्रात फिरायलाही गेला. नील पुण्याहून आला रे आला की या दोघांची भटकंती सुरू व्हायची.



सकाळी गावातल्या ग्रामदेवतेच्या मंदिरात, वाटेत असणाऱ्या बाबूलच्या शाळेत, गावाबाहेरच्या ओढ्यावर, अशी भरपूर भटकंती झाली की सायंकाळ जायची ती निवती बीचवरच्या रूपेरी वाळूत खेळण्यात. नीलला हा चंद्राकृती किनारा खूपच आवडायचा. किनाऱ्यावरच्या लाटांशी खेळताना पायाखालची वाळू सरकायची. परत जाणारी लाट पायाखालची वाळू ओढून न्यायची आणि धडपडायला व्हायचं. नीलची फट्फजिती व्हायची. पण तो क्षण त्याला खूप आवडायचा. वाळूतल्या अनेक गमतजमती बाबूलने त्याला सांगितल्या होत्या. शंख-शिंपले गोळा करायला शिकवलं. दोघं मिळून वाळूत मोठमोठे किल्ले बांधू लागले. समुद्राच्या ओल्या काठावर हातातंच एक खड्डा खोदायचा. त्यात आपोआप समुद्राचं पाणी भरायचं. मग सुक्या वाळूचा ढीग घेऊन पाण्याच्या सहाय्यानं किल्ला बांधायचा, किंवा ओलसर वाळू नीट चेपून दाबून किल्ल्याचे तट बनवायचे. खूप सुंदर असायचा तो! निवतीच्या किनाऱ्यावर फिरायला येणारे निवती-परुळे गावातले लोक हा किल्ला पाहून दोघांचंही कौतुक करायचे. एकदा तर बाबूलच्या शिक्षकांनी वाळूच्या किल्ल्याचा फोटो काढून शाळेतल्या इतर मुलांनाही दाखवून बाबूलचं कौतुक केलं होतं.

मे महिन्यातल्या मोठ्या सुट्टीच्या काळात तर बाबूल व नीलच्या भटकंतीला बहर यायचा. एकदा मे महिन्याच्या सुट्टीत बाबूल नीलला म्हणाला. ''उद्या तयारीनिशी ये. दुपारी माझे बाबा आपल्याला होडीतून समुद्रात फिरायला नेणार आहेत. उद्या त्यांचं मासेमारीचं काम बंद आहे त्यामुळे केवळ फिरूनच यायचंय.''

नील हे ऐकून जाम खूष झाला. दुसऱ्या दिवशी जेवण झाल्यावर डोक्यावर भलीमोठी हॅट घालून नील बाबूलच्या घरी आला. बिस्कीटपुडा, पाण्याची बाटली अशी सामुग्री घेऊन बाबूलचे बाबा त्या दोघांना घेऊन निघाले. वारा कमी होता. वातावरण चांगलं होतं. बाबूलच्या बाबांनी एक दोघांच्या मदतीनं होडी पाण्यात लोटली. हातात वल्ही घेऊन होडी वल्हवत ते निघाले. नील व बाबूल होडीच्या मध्यभागी बसून समुद्रसफरीची मजा लुटत होते. हा हा म्हणता होडी खोल समुद्रात शिरली. समुद्राच्या लाटांवर नाचू लागली. नीलच्या पोटात धस्स झालं. पण फारशी भिती नाही वाटली त्याला. कारण त्याचा जिवलग मित्र होता ना सोबत!

''हा निवतीचा समुद्रकिनारा...तो पलीकडे दिसतोय तो भोगवे बीच...पुढे त्या बाजूला मालवण बंदर. इकडे वेंगुर्ले बंदर. हे समुद्रात उंच खडक दिसतायत ना, त्याला निवतीचे खडक किंवा वेंगुर्ला रॉक्स म्हणतात.''

बाबूलचे बाबा माहिती सांगू लागले आणि हे दोघे लक्षपूर्वक ऐकू पाहू लागले

''आता आपल्याला वेंगुर्ला-निवतीचं दीपगृह पहायला मिळेल, बरं का.''

''हो हो, ते बघा, दूर दिसतंय, क्षितिजाजवळ तेच ना? एक चमकणारा उंच खांब दिसतोय.'' नील म्हणाला.

''हो बाळा, तेच लाईटहाऊस म्हणजे दीपगृह बरं का. हे नवं दीपगृह. त्याच्या पुढे आत आणखी एक जुनं दीपगृह आहे. पण किनाऱ्यापासून ते खूपच दूर आहे. ब्रिटिशांनी शंभर वर्षांपूर्वी बांधलेले ही दीपगृह. पूर्वी बोटी या खडकांवर आपटून बुडायच्या. शिवाय त्याना किनाऱ्याची दिशाही कळायची नाही. म्हणून या खडकांच्या बेटांवर दीपगृहे उभारली गेली. जुनं दीपगृह त्सुनामीच्या लाटेत उध्वस्त झालं. काही जण म्हणतात रात्री तिथं शेकोटी पेटवली जायची व प्रकाश निर्माण करून होड्यांना दिशा कळवली जायची. त्यात ते आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं. तिथपर्यंत इंधन नेणं ही अवघड झाल्याने मग जरा जवळच्या या खडकांवर हे दुसरं नवं दीपगृह बांधलं गेलं. ते मात्र अत्याधुनिक आहे बरं का, ९० वर्षे झाली तरी कार्यरत आहे. नील व बाबूल कौतुकानं ऐकू लागले तसं बाबा पुढे म्हणाले. ''चला बाळांनो, आपण आणखी थोडं पुढे चाऊ, मी तुम्हांला 'म्हाताऱ्याची चूळ' दाखवतो.

**(क्रमशः)**

**संपर्क : ९४२३२९५३२९**

## इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीची' मराठी व इंग्रजी माध्यमातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण प्रात्याक्षिक कार्य नोंदवही



राज्यातील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी
तज्ज्ञ शिक्षकांच्या सहाय्याने
तयार करण्यात आलेल्या विविध विषयांच्या
उपयुक्त प्रात्यक्षिक नोंदवह्या.
दैनंदिन तसेच स्वयंअभ्यासाकरिता
तसेच उजळणीकरिता उपयुक्त.

**नोंदणीकृत विक्रेते व शैक्षणिक संस्थांना १५% सवलत**










**वरील प्रात्यक्षिक कार्य नोंदवह्या खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा**

विभागीय भांडारे

पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८




# नवीन संकल्पाची भाषा

चारुता प्रभुदेसाई

नवे वर्ष सुरू झाले की अनेक नव्या गोष्टी ठरवल्या जातात. लहान, थोर, सर्व जण असे संकल्प करतात. पण हे संकल्प काही दिवसांपुरते असतात. नवीन असताना ते पूर्ण केले जातात. पण जसे जुने होतील तसे त्यात सातत्य राहत नाही. पण अवनी, आकाश, व्योम, परिमला हे मित्रमैत्रिणी असे नव्हते. एकाच सोसायटीमध्ये राहणारे. हे सर्व एकाच शाळेत जात होते.

त्यांच्या शिक्षकांनी त्यांना नवीन वर्षाचे संकल्प करायला सांगितले. हे संकल्प पूर्ण वर्षभर करून त्याच्या नोंदी ठेवायच्या होत्या.

अवनीने ठरवलं, या वर्षी मराठीतील म्हणींचा संग्रह करू, त्यांचा वापर, म्हणींच्या गोष्टी, असा काही प्रकल्प करता आल्यास पहावा, असा तिचा विचार होता.

आकाशने रोज आईला मदत करण्याचा संकल्प केला.तो तिला रोज काही काम द्यायला सांगणार होता.

व्योमचे अक्षर चांगलं नव्हतं. मग त्याने हस्ताक्षर सुधारण्याचा संकल्प केला. रोज शुद्धलेखन आणि

चांगले अक्षर लिहिण्याचा सराव करायचा असे त्याने ठरवले.

परिमलाने ठरवलं रोज वर्तमानपत्र वाचायचं, त्यातील बातम्यांची कात्रणे काढून ठेवायची आणि शाळेत तो संग्रह न्यायचा.

झालं, ठरलं, सगळ्यांना असं झालं की बाईंना कधी सांगतोय!

बाईंनी त्यांना सांगितलं की, ''संकल्प केलेली गोष्ट सातत्याने करायची असते. रोज त्या संदर्भात काही ना काही काम करावे लागते तरच तो तडीला जातो.'' अवनीने म्हणी गोळा करायला सुरुवात केली. तिने एक वही घेतली आणि त्यात म्हणी लिहायला सुरुवात केली. हळू हळू तिला आज्जी, आई यांच्या बोलण्यात सुद्धा तशा म्हणी दिसू लागल्या, मग लक्षात आलं की अवयव, प्राणी,पदार्थ यांच्यावरून अनेक म्हणी आहेत, आणि सगळं गोळा करणं खूप मजेशीर आहे. तिला आता म्हणींचा नादच लागला.

आकाशने आईला मदत करायला सुरुवात केली. तो आता काही कामे नव्याने शिकू लागला. घराची स्वच्छता, करणे कपड्यांच्या घड्या करणे, झाडांना पाणी घालणे, दळण आणणे, आईबरोबर भाजी आणणे, भाजी चिरणे अशी छोटी छोटी कामे तो शिकू लागला. त्याला कळलं की या कामांना किती वेळ लागतो आणि ही कामे किती कौशल्याची आहेत ते. आता आई त्याला रोज एक काम  शिकवू लागली. संकल्प करून अजून आठ दिवसच झाले होते. पण आकाश उत्साहाने काम करत होता.

व्योमचा हस्ताक्षर सुधारणा प्रकल्प आकार घेत होता. त्याच्या शेजारचे काका उत्तम सुलेखनकार होते. त्यांचे अक्षर सुंदर होते. त्यांच्याकडे जाऊन व्योमने अक्षर वळणदार करायला सुरुवात केली. पहिले दोन दिवस खूप कंटाळा आला, पण नंतर त्याला गोडी लागली. पेन कसे धरायचे, अक्षरांचे strokes कसे असतात, असं हळू हळू तो शिकू लागला. आठ दिवस त्याला विविध अक्षरांची नव्याने ओळख झाली आणि हा अक्षर प्रकल्प वर्षभर चालू ठेवण्याचे त्याने नक्की केले.

परिमला आता पेपरच्या ढिगाऱ्यात रमू लागली. तिला खेळाची आवड होती, म्हणून ती पेपरमधील क्रीडाविषयक बातम्या काळजीपूर्वक कापून ठेवू लागली. पेपरमध्ये किती वेगवेगळे विषय येतात, त्यात शहरी ग्रामीण,खेळ, सिनेमा, राजकीय, सामाजिक असे नानाविध विषय असतात हे ती नव्याने पाहू लागली. रविवारी येणाऱ्या पुरवणीत मुलांचा विभाग असतो, त्यात येणारे वेगवेगळे विषय, कोडी, चित्रे, सगळं ती बारकाईने बघू लागली.एक नवा छंद तिला लागला. संकल्प करून आठ दिवस झाले, पण कात्रणे चिकटवून वीस पाने भरली होती. तिला खूप आनंद वाटत होता.

आज सगळे मित्रमैत्रिणी सोसायटीच्या  बागेत जमले होते आणि आपापले अनुभव सांगत होते. पण सर्वांना आपण वेगळं काही करतोय याचे खूप समाधान वाटत होते.

संकल्प करून आठ दिवस झाल्यावर बाईंनी एक फॉलोअप घेतला. तेव्हा या चौघांनी आपले अनुभव सांगितले. त्यांचं ऐकून इतर मुलांनीही आपले संकल्प पूर्ण करण्याचा एक नवा संकल्प केला.

बाईंनी त्यांना एक छान कविता लिहून दिली.

नवीन संकल्पाची भाषा आता मुलांना कळली होती!

**नव वर्षाचे गाणे!**

**सरली पाने गत वर्षाची**
**चाहूल लागे नववर्षाची !**
**सुखशांतीची मनात आशा**
**नवीन संकल्पाची भाषा!**
**नव्या नभाचे नवीन पक्षी**
**सूर छेडती जुळवीत नक्षी !**
**नवे रंग उधळले प्रकाशी**
**किरण हासती त्या अवकाशी !**
**नवा सूर्य अन नवीन किरणे**
**नव्या ऋतूची नवीन पाने!**
**नवा नवा हा दिवस कोवळा**
**नव वर्षाचा नवा सोहळा!**
**नव्या फुलांचा नवाच परिमल**
**नवे दाविती पराग कोमल !**
**नवे गीत अन नवे तराणे**
**चला गाऊ या मुक्त स्वराने!**

**संपर्क : ९९२२७५१८१९**

## ❋ चला चित्र रंगवूया...!!!

सोनू आणि मोनू भातुकली खेळत होते तेव्हा त्यांच्याकडे खाऊ खायला एक प्राणी आला. कोण आलं असेल बरं... ? तुम्ही त्याचं चित्र काढून पूर्ण करा आणि रंगवा.

रेश्मा बर्वे



# कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय? भाग १

**अच्युत गोडबोले**

**मित्रमैत्रिणींनो, कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात Artificial intelligence (AI) हा शब्द तुमच्या कानावर सतत पडत असेल ना? तुमचे आई–बाबा, ताई–दादा, शिक्षक यांना याविषयी अधूनमधून बोलताना तुम्ही पाहत असाल. AI म्हणजे जणू आजच्या वेगवान आणि बदलत्या काळाचा परवलीचा शब्द. अलिबाबाच्या 'खुल जा सिम सिम' सारखा. हा शब्द उच्चारताच अलिबाबाच्या गुहेत प्रवेश केल्यानंतर दिसणाऱ्या विविध वस्तू पाहून जसे डोळे विस्फारतात, तसेच काहीसे या AI या शब्दामुळे झाले आहे. हा AI आजघडीला सर्वांच्याच जगण्याचा एक महत्त्वाचा भाग झाला आहे. इतके या मानवनिर्मित तंत्रज्ञानाने आपल्या जगण्याला वेढले आहे. विविध कला, विज्ञान, अर्थकारण, समाजकारण या मानवी जीवनाच्या विविध अंगांना तसेच पर्यावरण आणि विश्वातील असंख्य घटकांना AI ने आपल्या कवेत घेतले आहे. जुन्या जमान्यातील प्रतिसृष्टी, मयसभा यांसारखे शब्द जर तुम्ही कधी ऐकले असतील तर त्या शब्दांच्या अर्थाशी नाते सांगणारे काम AI करत आहे. म्हणजे नेमके काय काम करत आहे? मुळात AI म्हणजे तरी काय? ML,ChatGPT, Midjourney, DLL-E हे आहे तरी काय? AI विषयाच्या यासारख्या विविध संकल्पना तुम्हांला सहज सोप्या भाषेत या 'AI आणि उद्याचं जग' सदरातून समजावून सांगणार आहेत प्रसिद्ध अभ्यासक, संगणक तज्ज्ञ आणि लेखक अच्युत गोडबोले.**

१९५० मध्ये विख्यात ब्रिटिश संगणकतज्ज्ञ ॲलन ट्युरिंग यानं 'माईंड' नावाच्या नियतकालिकात एक लेख प्रकाशित केला. या लेखाचं नाव होतं 'कॉम्प्युटिंग मशिनरी अँड इंटेलिजन्स'. या लेखामध्ये ट्युरिंगनं 'मशिन्स विचार करू शकतील का?' या प्रश्नावर आपले विचार मांडले होते. हे विचार काळाच्या खूपच पुढचे होते. कॉम्प्युटर्स विचार करू शकतील ही कल्पनाच त्या काळच्या लोकांना 'सायन्स फिक्शन' मधल्या कल्पनेसारखी वाटली. ट्युरिंगला मात्र वाटत होतं की भविष्यकाळात विचार करू शकणारे, बुद्धिबळ खेळू शकणारे, आजूबाजूला काय चाललंय ते पाहून शिकत जाणारे, मानवी भाषेत संवाद साधणारे कॉम्प्युटर्स बनू शकतील. विचार करू शकणाऱ्या कॉम्प्युटर्सविषयी लिहिताना ट्युरिंगनं एका प्रकारे कृत्रिम बुद्धिमत्तेची (Artificial Intelligence - AI) संकल्पना मांडली होती.



कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) म्हणजे नेमकं काय? माणसांना ज्या गोष्टी करण्यासाठी बुद्धिमत्तेची गरज लागते असं मानलं जातं, अशा गोष्टी कॉम्प्युटर करू शकत असेल तर तो कॉम्प्युटर कृत्रिम बुद्धिमत्तेचं तंत्रज्ञान वापरतो असं आपण म्हणतो. खरंतर बुद्धिमत्ता म्हणजे नेमकं काय ते अगदी अचूकरीत्या सांगणं कठीण आहे. पण कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात काम

करणाऱ्या संशोधकांच्या मते शिकणं (लर्निंग), तर्क करणं (रीझनिंग), प्रश्न सोडवणं (प्रॉब्लेम सॉल्व्हिंग), संवेदना (पर्सेप्शन) आणि नेहमीच्या भाषेचा (नॅचरल लॅंग्वेज) वापर करता येणं, तसंच माणसासारख्या हालचाली करणं (रोबॉट्स) या सगळ्या गोष्टींचा 'कृत्रिम बुद्धी'मध्ये समावेश होतो.

ट्युरिंगच्या काळात AI ही फक्त कल्पनाच होती. नंतरच्या काळात संशोधकांनी AI प्रत्यक्षात आणण्यासाठी कित्येक दशकं काम केलं. गेल्या काही वर्षांमध्ये कॉम्प्युटिंग पॉवर प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे, मोठ्या प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या डेटामुळे, तसंच तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे AI तंत्रज्ञानानं मोठीच झेप घेतली आहे. भविष्यकाळात AI तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडतीलच, पण आजही कित्येक क्षेत्रात AI नं उलथापालथ करायला सुरुवात केली आहे. आपण एखादी वस्तू ऑनलाईन खरेदी करत असतो तेव्हा आपल्याला खरेदीसाठी बऱ्याचशा नवीन वस्तू सुचवल्या जातात त्या AI तंत्रज्ञान वापरूनच. वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतरं करणं आज AI मुळे खूपच सोपं झालं आहे. एखादी सनसनाटी बातमी 'फेक न्यूज' आहे का ते तपासण्यासाठीही AI तंत्रज्ञान विकसित करण्यात आलंय. आरोग्य क्षेत्र असो वा उत्पादन क्षेत्र, सेवा क्षेत्र असो वा मनोरंजन क्षेत्र, AI चा प्रवेश सगळीकडेच झालाय.

ढोबळमानानं कृत्रिम बुद्धिमत्तेचे AI २ प्रकार असतात : वीक AI (किंवा नॅरो AI) आणि स्ट्रॉंग AI (किंवा आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स AGI). वीक AI एखादं विशिष्ट काम करण्यात तरबेज असतं. उदा. MRI स्कॅनच्या प्रतिमा पाहून निष्कर्ष काढण्याचं काम वीक AI तंत्रज्ञान करू शकतं. पण MRI स्कॅनच्या प्रतिमांवर काम करणाऱ्या या वीक AI च्या प्रोग्रॅम्सना आपण हवामान अंदाज विचारला तर आपल्याला उत्तर मिळू शकत नाही. आज आपल्याला आजूबाजूला दिसतं ते याच प्रकारचं AI ॲमेझॉनचं ॲलेक्सा, ॲपलचं सीरी किंवा सेल्फ ड्रायव्हिंग कार्स ही सारी वीक AI ची




उदाहरणं मानता येतील. चॅट-जीपीटी बऱ्याच प्रकारच्या प्रश्नांची उत्तरं देऊ शकत असलं तरी ते वीक AI चंच उदाहरण आहे. कारण ते मर्यादित माहितीवर काम करणाऱ्या लार्ज लॅंग्वेज मॉडेल्स (LLM) तंत्रज्ञानावर आधारलेलं आहे.

स्ट्रॉंग AI बनवण्यात माणसाला अजून यश आलेलं नाही. स्ट्रॉंग AI मध्ये मानवी बुद्धिमत्तेइतकी (किंवा त्यापेक्षा जास्त) पातळी गाठली जाईल. स्ट्रॉंग AI तंत्रज्ञान स्वतःच तर्क करत (रीझनिंग), संशोधन करत प्रॉब्लेम्स सोडवेल! मर्यादित माहितीच्या पलीकडे जात उत्तरं शोधणं ही स्ट्रॉंग AI ची खासियत असेल. स्ट्रॉंग AI ला सुपरइंटेलिजन्स असंही म्हणतात. AI च्या क्षेत्रात काम करणारे संशोधक स्ट्रॉंग AI प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करत आहेत. ते प्रत्यक्षात येईपर्यंत आपल्याला स्ट्रॉंग AI फक्त कादंबऱ्यांमध्ये आणि चित्रपटांमध्येच पाहण्यावरच समाधान मानावं लागेल.

येणाऱ्या काळात AI मुळे एका बाजूला मानवी जीवनात प्रगती होणार असली, तरी दुसऱ्या बाजूला नोकऱ्या कमी होत जाणार किंवा निदान कामाचं स्वरूप आमूलाग्र बदलणार हे मात्र नक्की !

**संपर्क** : achyut.godbole@gmail.com



# चांगले नेटिझन्स बना..!

सुधीर साबळे

अतुल आणि अक्षय हे दोघे जण चांगले मित्र. एकाच शाळेत दोघे जण शिकत होते, अतुल होता आठवीत तर अक्षय सातवीत. या दोघांना मोबाईल, फेसबुक, वॉट्सअप यांविषयी फारच आकर्षण. घरी जेव्हा केव्हा वेळ मिळायचा, तेव्हा हे दोघे जण अधिकाधिक वेळ मोबाईलवर खर्च करायचे, त्यामध्ये त्यांचा अर्धाअधिक वेळ हा इंस्टाग्रामवर येणारी वेगवेगळी रिल्स पाहण्यात जायचा, हळूहळू त्यांना त्याचे व्यसनच लागले. कालांतराने ऑनलाईन व्यासपीठावर वेगवेगळ्या वेबसाईटच्या माध्यमातून त्यांनी गेम्सचा शोध घेत त्या खेळण्यास सुरुवात केली. त्यामधून मित्रांचे ग्रुप बनले, या गेम्स ऑनलाईन खेळण्यास सुरुवात झाली, कोण सर्वाधिक पॉईंट मिळवतो, पहिला येतो, यासाठी चढाओढ सुरू झाली, स्मार्ट मोबाईल हातात असताना या दोघांना अनेक गोष्टींची माहिती झाली होती, बऱ्याचदा ते त्याचा वापरदेखील करू लागले होते, शाळा, अभ्यास याच्या जोडीला त्यांच्या हातात असणाऱ्या मोबाईलमुळे ते शालेय वयातच टेक्नोसॅव्ही झाले होते, य दोघांचे पालक त्यांना ओरडत, रागावत पण त्यांच्यावर त्याचा काहीच परिणाम होत नसे, तेवढ्यापुरतं हो हो करून हे दोघे जण आपला दिनक्रम नेहमीप्रमाणे सुरू ठेवत असत. दोघांचे आईवडील नोकरी करत त्यामुळे दिवसभरातून दोनचार वेळा त्यांची विचारपूस करण्यासाठी ते आपल्या मुलांना फोन करत असत. शाळेतून घरी आल्यावर दोघे जण सतत मोबाईलवर असत. एकदा चांगले पॉईंट मिळाले की मोठे रिवॉर्ड मिळणाऱ्या एका गेमची जाहिरात अक्षयच्या मोबाईलवर आली, त्यामुळे उत्सुकतेपोटी त्याने ती अतुलला पाठवली, झालं... मग काय दोघांनी त्याची लिंक एकमेकांना पाठवून ती गेम डाऊनलोड करण्यास सुरुवात केली. हा गेम होता, युद्धाचा. पण तिथेच हे दोघे जण फसले आणि एका क्षणासाठी त्यांचा मोबाईल

बंद झाला, हे अचानक काय झाले या भीतीने दोघे जण घाबरून गेले आणि त्यांनी मोबाईल बंद करून टाकला. संध्याकाळी आई-वडील घरी परतल्यावर त्यांनी अक्षयला विचारले, ''अरे तुझा फोन बंद कसा? मी तुला खूप वेळेला फोन केला'', त्यावर अक्षयने झालेला प्रकार त्यांना सांगितला. त्याचे वडील प्रफुल्ल यांनी त्याचा मोबाईल सुरू करण्याचा प्रयत्न केला पण तो होत नव्हता. अक्षय त्यांना आपला फोन अचानक बंद झाल्याचे सारखा सांगता होता, त्यामुळे हा फोन हॅक तर झाला नाही ना? या शंकेने प्रफुल्ल यांनी त्यांच्या सायबर तज्ज्ञ असणाऱ्या विनय नावाच्या मित्राला फोन करून घडलेल्या प्रकाराची कल्पना देऊन घरी येण्याची विनंती केली.

एका तासाभरात विनय प्रफुल्लच्या घरी आला. त्याने अक्षयकडून झालेला प्रकार ऐकला, काही वेळातच त्याने अक्षयचा फोन सुरू केला आणि त्याची तपासणी केली तेव्हा तो हॅक झाल्याचे निष्पन्न झाल्याचे त्याने सांगितले. आठवीतल्या मुलाकडे असणारा स्मार्ट फोन, त्यामध्ये झालेला हा प्रकार त्यामुळे विनयने त्यांना टेक्नॉलॉजीच्या युगात वावरत असताना आपण चांगले नेटिझन कसे व्हायचे हे सांगायला सुरुवात केली.

विनय हा प्रफुल्लच्या घरी आला, तेव्हा अक्षय आणि अतुल दोघेही तिथे होते. त्यांच्याबरोबर विनयचा संवाद सुरू झाला, ''मित्रांनो, तुम्हांला मोबाईल आवडतो का?'' त्यावर दोघांनी एका सुरात हसून 'हो,' असे उत्तर दिले. ''मलाही तुमच्या इतकाच मोबाईल आवडतो, पण त्याचा वापर करताना काळजी घ्यायची असते. वॉट्सअप. इंस्टाग्राम, फेसबुक, हे चांगले असले तरी त्याचा वापर देखील काळजीपूर्वक करायचा असतो. आपल्या मोबाईलवर जर कोणा अनोळखी व्यक्तीचा फोन आला तर तो घेऊ नका, मोबाईलमध्ये जे नंबर सेव्ह केलेले आहेत, ते उचलावेत. जर चुकून तुम्ही फोन घेतलाच तर समोरच्या व्यक्तीला कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नका, त्यामुळे अडचणीत येऊ शकता. मोबाईलवर जर तुम्हांला अनोळखी मोबाइल नंबरवरून एखादी लिंक आली, तर आपल्या उत्सुकतेपोटी ती उघडण्याचे धाडस करू नका, नाहीतर तुमचा फोन कसा हॅक झाला तसे काही प्रकार घडू शकतात. ऑनलाईन गेम्स खेळताना काळजी घेण्याची आवश्यकता आहे. आपल्या मोबाईलवर कोणतेही ॲप डाऊनलोड करताना घरातील मोठ्या व्यक्तींची मदत घ्या, तुमचे तुम्ही काही करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपण काय करतो, कुठे जाणार आहोत, याची माहिती फेसबुकवर जगजाहीर करण्याचे टाळा. पालकांनी देखील आपला मुलगा दिवसभर किती काळ मोबाईलवर असतो, तो काय पाहतो, याची दररोज तपासणी करणे आवश्यक आहे, विशेष म्हणजे जर तो ऑनलाइन गेम्सच्या प्रेमात पडला असेल तर त्याकडे अधिकचे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शाळेत असताना शिकवलेली गोष्ट मुलांच्या चांगल्या प्रकारे लक्षात राहते, त्यामुळे मोठे झाल्यावर आपण चांगले सिटीझन कसे होऊ, याचे धडे देत असतानाच दुसरीकडे त्यांना चांगले नेटिझन्स होण्याचे धडे देण्याची आवश्यकता आहे. संगणक, इंटरनेट, मोबाईल याचा वापर करताना कोणते नियम आचारसंहिता पाळायच्या हे सांगितले तर ते योग्य वयात सायबर साक्षर होतील, आणि त्याचा भविष्यात त्यांना चांगला फायदा होईल. सायबर साक्षर होताना, त्यांना ऑनलाईन व्यवहार कसे होतात, त्यामध्ये कुठे फसवणूक होऊ शकते, ती कशी होऊ शकते, याची माहिती पालकांनी दिली तर त्या उपयुक्त ठरणाऱ्या आहेत. भविष्य काळात तंत्रज्ञान वापरण्याचा ओघ हा वाढत जाणार आहे, त्यामुळे त्याचा वापर करणे चांगले की वाईट, यावर चर्चा करत बसण्यापेक्षा आपल्या पाल्याला आपण चांगले नेटिझन्स कसे करू शकू? यांकडे पालक आणि शाळांनी लक्ष देण्याची गरज आहे.''

अतुल आणि अक्षय या दोघांना विनयने चांगले नेटिझन्स होण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे, याची प्राथमिक माहिती दिली होती, त्यामुळे तेदेखील सजग झाले होते, बघा मित्रांनो, अतुल आणि अक्षय या दोघांचा फोन एका अनोळखी लिंकमुळे हॅक झाला, त्यामुळे त्यांना सोशल मीडियाचा वापर करताना काय काळजी घ्यायची हे विनयकाकांनी सांगितले. त्यामुळे तुम्हीसुद्धा चांगले नेटिझन्स होण्याचा प्रयत्न करा... त्याचा मोठे झाल्यावर तुम्हांला त्याचा चांगला फायदा होईल, हे नक्की....

**संपर्क** : ९४२१०८००७२

# ऐका कान देऊन

**डॉ. नीलिमा गुंडी**

**मुलांनो, कोणत्याही शब्दातून त्याच्या अर्थाकडे पोहोचणे, हा एक प्रकारचा प्रवास असतो. त्या प्रवासात वेगवेगळ्या कारणांनी अडथळे येऊ शकतात. त्यासाठी लेखन करताना जागरूक रहावे लागते. प्रसिद्ध भाषा अभ्यासक डॉ. नीलिमा गुंडी यांनी 'अर्थाचा पत्ता सापडला' या सदरात त्यासाठी लालित्यपूर्ण शैलीत मार्गदर्शन केले आहे.**

आईने सांगितलेला एकेक शब्द किमया लिहित होती. मात्र काही अक्षरे लिहिताना तिचा गोंधळ उडत होता. काही अक्षरे ती नीट कान देऊन ऐकत नव्हती. समजा, एखादे अक्षर तिने जरी नीट ऐकले. तरी तिच्या मनातच गोंधळ होता! आता पहा ना, आईने तिला वाक्य घातले होते. 'अकबराने बिरबलाला प्रधानपदाची सूत्रे प्रदान केली.' तिने लिहिले होते– 'अकबराने बिरबलाला प्रधानपदाची सूत्रे प्रधान केली.'

किमयाच्या मनातला गोंधळ आईच्या लक्षात आलाच! ती म्हणाली, ''अगं, 'प्रदान करणे' म्हणजे सन्मानाने देणे, असा अर्थ आहे. 'प्रधान' हे पद म्हणजे दरबारातला एक हुद्दा आहे. 'द' नंतर 'ह' हे अक्षर आलं. तर काही वेळा चुकून 'ध' असं ऐकू येतं नि चूक होते मुलांची! पण इथे तसं नाही. थांब. मी तुला आता आणखी वाक्यं सांगते; ती लिही– १) ताईंनी चुकलेले वाक्य दहादा लिहायला सांगितले आहे.

२) द्रौपदीने कृष्णाचा धावा केला. झालं का लिहून?''

किमयाने काय लिहिलं आहे, ते आई पाहू लागली. तिची हसता हसता पुरेवाट झाली. ती म्हणाली, ''किमया, तू हे






भाग १

काय लिहिलं आहेस? १) ताईंनी चुकलेले वाक्य धाधा लिहायला सांगितले आहे. २) द्रौपदीने कृष्णाचा दहावा केला.''

''किमया, मी 'दहादा' असं म्हटलं होतं. तू 'धाधा' असं लिहिलं आहेस! आणि द्रौपदीने कृष्णाचा 'धावा' केला म्हणजे त्याची आळवणी केली, त्याच्या नावाचा जप केला. 'दहावा' नव्हे! अगं, तुला प्रियाकडे जायचं असेल आणि तू तिच्या घराकडे जाणाऱ्या गल्लीऐवजी शेजारच्या गल्लीत शिरलीस तर तू पोहोचशील का प्रियाकडे? शब्दांमधली अक्षरं नीट लिहिली नाहीस, तर असा अर्थाचा पत्ताही चुकतो. कळलं का?'' आईने तिला समजावले. किमया पटकन म्हणाली, ''आई, तुझं बरोबर आहे. काल पोस्टमनकाका मला विचारत होते की 'तुमच्या  घराजवळ 'भांबरे' नावाचे कोणी राहतात का?'' मी म्हटलं ''नाही'' तेवढ्यात आबा बाहेर आले नि म्हणाले, ''अहो, समोर 'महांबरे' राहतात. त्याचं नाव चुकीचं लिहिलं गेलं असेल कदाचित! त्यांना विचारा बरं!'' यावर आई म्हणाली, ''अगदी बरोबर! तूही हे नीट लक्षात ठेव. पत्ता चुकीचा किंवा अपूर्ण लिहिला तर जसं पत्र पोहोचताना अडथळा येतो. तसंच शब्द लेखनात त्रुटी राहिली तर अर्थापर्यंत पोहोचण्यात अडथळा येतो.

''आई, माझा 'न' आणि 'ण' मध्येही लिहिताना गोंधळ होतो गं!'' किमया हळूच म्हणाली. ''अगं, गोंधळ होतो. कारण तुम्ही पुस्तक वाचताना अक्षराकडे नीट लक्ष देत नाहीत. आता मी घरातल्या आपल्या फळ्यावर रोज काही अवघड शब्द लिहून ठेवत जाईन. ते जाता-येता लक्षपूर्वक पाहत जा! मनातही अक्षराचा नीट उच्चार करत जा! थोडी सवय होईतो मोठ्याने वाचत जा! म्हणजे माझंही लक्ष राहील तुझ्या वाचनाकडे! नीट उच्चार करत राहिलीस की तुझे कानही तयार होतील. फक्त गाणं ऐकायला 'कानसेन' लागतात, असं नाही. लेखन वाचन उत्तम यायलाही 'कानसेन' व्हावं लागतं बरं !'' ''कानसेन म्हणजे काय?'' ''अगं, तानसेन हा उत्तम गायक होता. हे माहीत आहे ना तुला? जसं गाण्याला योग्य दाद देणारा रसिक श्रोता म्हणजेच गाणं बारकाईनं ऐकणारा तो कानसेन; तसंच लेखनवाचन या कलेत कौशल्य मिळवणारा तोही कानसेन? आता मी तुला 'द' आणि 'ध' एकत्र आलेले शब्द घालते, ते लिही – १) दूध  २) सुद्धा''

किमयाने दोन्ही शब्द योग्य प्रकारे लिहिले. हे पाहून आई म्हणाली, ''तुझ्या बाबांना गाणं आवडतं. आता मी गाण्याशी नातं असलेले दोन शब्द घालते. लिही.




१) दिड दा, २) धा धिन धा''

''आई, दिड दा' हा सतारीचा आवाज आणि 'धा धिन धा' हा तबल्याचा आवाज होना? मी बरोबर लिहिले आहेत बघ हे शब्द!'' किमया म्हणाली.

''छान! आता तुझ्या डोक्यातला 'न' आणि 'ण' चा गोंधळ निस्तरून टाकू! खरं तर 'ण'चा उच्चार इतका खणखणीत असतो. फक्त आपले कान तयार हवेत ऐकायला! लिही... १) कार्यकर्त्यांने तन, मन, धन, अर्पून काम करावे,

२) लीना तक्रार करत असते सारखी! मात्र घरमालकाच्या अटी तिने अगदी विनातक्रार मान्य केल्या!

किमयाने लिहिताना गडबड केलीच होती. तिने लिहिले होते. १) कार्यकर्त्यांने तणमणधन अर्पून काम करावे.

२) लीना तक्रार करत असते सारखी! मात्र घरमालकाच्या अटी तिने अगदी विणातक्रार मान्य केल्या.''

ते वाचून आई म्हणाली. ''अगं, 'न' चा 'ण' झाल्यावर अर्थ किती बदलून गेला आहे बघ! 'तन मन' म्हणजे  शरीर आणि अंतःकरण. 'तणमण' म्हणजे काय झाला अर्थ? तण म्हणजे गवत आणि मण हे धान्य मोजायचं एक वजनाचं माप आहे. तू लिहिलं आहेस- विणा-तक्रार. तिथे 'विनातक्रार' असं हवं. विना म्हणजे शिवाय. तक्रारीशिवाय. वीणा हे मुलीचं नाव असतं. कळलं, किती अर्थ बदलला ते!''

तेवढ्यात बाबा मिश्कीलपणे गाणं गुणगुणत आले.

''जाना था जापान, पहुँच गये चीन!'' यावर सगळेच हसले. किमया पटकन म्हणाली, ''आई, मी दोन्ही वाक्यं दुरुस्त करते. म्हणजे अर्थाचा पत्ता बरोबर सापडेल!''

''शाब्बास!'' आईबाबांनी तिला प्रोत्साहन दिले.

**संपर्क : ९८८१०९१९३५**

सुचिता कुलकर्णी-जोशी

# तिळगूळ घ्या गोडगोड बोला

तिळगूळ घ्या गोड बोला
नकोत सारे रुसवे फुगवे
नकोत कटुता मनामध्ये
आनंदाने नांदू चला हो
धरू नका अबोला
तिळगूळ घ्या गोड गोड बोला
तिळगूळ घ्या गोड बोला

तीळाने वाढे प्रेम अंतरी
गुळाने वाढे गोडी
नको दु:ख अन् खंत उगाचच
मन अंतरी खोला
तिळगूळ घ्या गोडगोड बोला
तिळगूळ घ्या गोड बोला

जीवनाची तर गंमत भारी
कधी दु:ख तर सुख हो दारी
जीवनचक्र नित्य हे चालू
शिकूया जीवन कला
तिळगूळ घ्या गोडगोड बोला
तिळगूळ घ्या गोड बोला

स्नेह प्रेमाचा तीळतीळ वाढो
वाढो आंतरिक गोडी
अखंड राहो बंध प्रेमाचे
आनंद देऊ चला
तिळगूळ घ्या गोड गोड बोला
तिळगूळ घ्या गोड बोला

संपर्क : ८२७५२३२०४५



# लोकमाता

बबन शिंदे

बालमित्रांनो, आपल्याला माहीत आहे की, महाराष्ट्र ही संतांची आणि वीरांची भूमी आहे. आपल्याला फार मोठी संत परंपरा लाभली आहे. या तत्कालीन संतांमध्ये महिलापण होत्या. संत जनाबाई, संत मुक्ताबाई, तसेच उत्तम संस्कार पेरणाऱ्या व शिवाजी राजांना घडवणाऱ्या जिजाबाईपण महाराष्ट्राच्या एक खंबीर महिला होत्या. अगदी अलीकडच्या काळात शिक्षणाचा पाया भरणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाईसारख्या तेजस्वी महिलांनी महाराष्ट्राच्या वैभवात भर टाकली आहे.

आज आपण संपूर्ण देशात महिला शिक्षणाचे रोपटे लावणाऱ्या सावित्रीबाईंची गोष्ट ऐकणार आहोत.

सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामधल्या नायगाव गावात, खंडोजी पाटील नावाचे एक गृहस्थ राहात होते. त्या गावाची पाटीलकी व इनामदारकीपण त्यांच्याकडे होती. खंडोजी पाटील हे अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू आणि जिद्दी होते. सावित्री ही खंडोजी पाटलांचे पहिल्ये अपत्य होती. त्यानंतर सिदुजी, सखाराम आणि श्रीपती हे तीन भावंडे जन्माला आली. सावित्री ही अत्यंत देखणी तसेच खूपच धाडसी होती. ती लहानपणापासून घरात आईला मदत करायची. शेतात गेल्यावर जनावरांची काळजी घ्यायची. तिला लहानपणापासून पोहायला येत होते. गोफण चालवण्यात तर तिचा हातखंडा होता. एकदा लहानपणी ती आपल्या मैत्रिणींबरोबर आमराईत खेळायला गेली होती. रस्त्यात तिला पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू आला. हा किलबिलाट नेहमीपेक्षा निराळा होता. त्यामुळे तिने त्या झाडांकडे निरखून बघितले. तिला एक मोठा नाग झाडावर चढताना दिसला. तो झाडाच्या ढोलीत असणाऱ्या पक्ष्यांची अंडी खायला जात होता. त्यामुळे बिचारे पक्षी गलका करीत होते. सावित्रीला त्या पक्ष्यांची कीव आली. तिने एका दगडात त्या नागाला खाली पाडले. त्या आवाजाने सर्व मैत्रिणी भयभीत होऊन गावाकडे पळाल्या. त्यांनी खंडोजी पाटलांच्या कानावर ही गोष्ट घातली. तेव्हा स्वत: खंडोजी पाटील आणि चार पाच माणसे धावत आली. तोपर्यंत सावित्रीने त्या नागाला कंठस्नान घातले होते.

हे पाहून खंडोजी पाटील म्हणाले, ''बेटी सावित्री, हे काय केलेस! तू एवढ्या बालवयात एका विषारी नागाशी लढायचे धारिष्ट्य करतेस. बेटी, असे धाडस बरे नव्हे. तुझ्या जीवाचे बरे वाईट झाले असते तर...'' असे म्हणत त्यांनी सावित्रीचे कान फुंकले.

त्यावर सावित्री निडरपणे म्हणाली, ''बाबा, हा साप पक्ष्यांची अंडी फस्त करणार होता. बिचारे पक्षी धाय मोकलून ओरडत होते. मला तो अन्याय सहन नाही झाला म्हणून मी त्याला मारले.''

सावित्रीचे हे उत्तर ऐकून खंडोजी पाटील चकित झाले आणि सावित्रीकडे बघत राहिले. सावित्रीचे बाणेदार उत्तर ऐकून ते एकदम अवाक् झाले. तिच्या धाडसाचे त्यांना कौतुक वाटले.

नायगावपासून तीन कि. मी. अंतरावर असणाऱ्या शिरवळ या गावी आठवडी बाजार भरत असे. आजूबाजूच्या परिसरातील लोक बाजाराला तिथे येत असत. सावित्रीला एकदा बाजारला जाण्याचा मोह आवरला नाही. कुतूहलापोटी तिने आईची परवानगी घेतली. अगदी हसतखेळत ती बाजारात पोचली. बाजारात अनेक ठिकाणी घाणीचे साम्राज्य होते. तिला अनेक खाद्यपदार्थ दिसले. पण जिलेबी हा तिचा अत्यंत आवडता खाऊ होता. तिने जिलेबी विकत घेतली आणि खात खात बाजारात फिरत होती. बाजारात एका झाडाखाली काही माणसे गाणी गात होती. सावित्री ते ऐकून झाडाखाली पोहोचली. ती जिलेबी खात खात गाणे ऐकण्यात देहभान विसरून गेली. एवढ्यात एक गोरासाहेब तिच्याजवळ येऊन म्हणाला, ''अरे बाळ, रस्त्यावर असे खाऊ नये. उघड्यावरच्या खाद्य पदार्थांमुळे आरोग्य बिघडते. त्यावर रस्त्यावरची धूळ आणि घाणेरड्या माशापण बसत असतात.'' त्या गोरे साहेबांचे म्हणणे सावित्रीला पटले. तिची चूक तिच्या लक्षात आली. तिने हातातला खाऊ फेकून दिला. तिचा समंजसपणा पाहून तो गोरा अधिकारी म्हणाला, ''बाळ, हे घे तुला एक पुस्तक. तू या वयात जरी वाचू शकली नाही तरी ही चित्रे बघ पुस्तकातली.'' ते पुस्तक घेऊन सावित्री घरी परतली. सावित्रीला पुस्तक दिल्याची बातमी गावभर फैलावली. हे समजताच खंडोजी

पाटलांनी लहानग्या सावित्रीची खरडपट्टी काढली. नुसत्या स्पर्शानेही माणूस बाटतो ही खुळचट कल्पना सावित्रीच्या बालबुद्धीला पटत नव्हते. तिने वडलांच्या आदेशाप्रमाणे ते पुस्तक फेकून दिले खरे. पण काही वेळातच वडलांची नजर चुकवून तिने ते पुन्हा हस्तगत केले. कालांतराने तिचे लग्न झाल्यावर ते पुस्तक सोबत नेले. त्या पुस्तकात काय असेल याचे तिला अनेक वर्षे कुतूहल होते. लग्न झाल्यानंतर तिचे पती जोतिबा फुले यांनी तिला शिकवले. तेव्हा सावित्रीबाईंनी ते पुस्तक जोतिबांना दाखवले, ते येशूचे चरित्र होते. सावित्रीबाईंनी ते पुस्तक पूर्ण वाचून काढले. आता त्यांची जिज्ञासापूर्ती झाली होती. एवढी जिद्द त्यांच्या अंगी होती.

पुढे सावित्रीबाईंचे पती जोतिबा फुले यांनी, पुण्याच्या बुधवार पेठेत मुलींसाठी पहिली शाळा काढली. पण शाळेत मुलींना कुणीच पाठवेना. त्या काळी मुलींनी शिक्षण घेणे म्हणजे पाप मानले जात होते. ते धर्माच्या विरुद्ध असल्याचा लोक समज होता. शिवाय मुलींच्या शाळेत कुणी शिकवायला तयार होईना. कोणी तयार झाल्यास समाजातील कारस्थानी लोक त्यांना त्रास देत असत. म्हणून जोतिबांनी सावित्रीबाईंना शिक्षण दिले. पुढे त्या शिक्षिका झाल्या. मुलींच्या शाळेत महिला शिक्षिका हा पहिला अभिनव प्रयोग सुरू झाला. सावित्रीबाईंनी पुढे इंग्रजीचे ज्ञानही संपादन केले. त्या हिंदुस्थानच्या पहिल्या शिक्षिका बनल्या. त्यांनी स्त्रियांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी समाजसेवेचे व्रत धारण केले.

सावित्रीबाईंचे नव्हे तर, फुले दांम्पत्याचे हे काम अनेकांच्या मनात खूपत होते. अनेकांची डोकी भडकली. त्यांनी सावित्रीबाईंना असह्य त्रास देण्यास सुरुवात केली. त्यांच्या अंगावर दगड, गोटे, शेण आणि चिखलफेक केली. धर्मबुडवी सारखी उपमा दिली. तरीही सावित्रीबाईंनी हार मानली नाही. एके दिवशी त्या रस्त्यावर थांबून दगड फेकणाऱ्या लोकांना उद्देशून म्हणाल्या, ''मी माझ्या लहानसहान गोरगरीब माता भगिनींना शिकवण्याचे महान पवित्र कार्य करीत आहे. ते रोखण्यासाठी आपण माझ्यावर शेण, चिखल फेकत आहात. पण ते माझ्यासाठी हार, फुले असल्याचे मी मानते. ईश्वर तुम्हांला सुबुद्धी देवो. आयुष्यभर सुखी ठेवो. मी माझे कर्तव्य करते. तुम्ही तुमचे काम करा.'' सावित्रीबाईंचे हे शब्द ऐकून काही लोकांना समज आली होती. पुढे जोतिबांनी वेताळ पेठेत मागासवर्गीयांसाठी शाळा काढली. सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिका म्हणून काम बघू लागल्या. या शाळेत सगुणाबाई आणि फातिमाबी शेख यांनी अनमोल योगदान दिले.

सावित्रीबाईंनी सर्वधर्मसमभाव हे व्रत स्वीकारले होते. त्यांचे हे काम पवित्र आणि उदात्त होते. या कार्यामुळे त्यांच्या जीवावर बेतले होते, शिवाय स्वत:चे घरपण मुकले. तरीपण त्यांनी धैर्य खचू दिले नाही. त्यांना वाळीत टाकण्याच्या धमक्या मिळाल्या. पण हे फुले दांपत्य डगमगले नाही. शिवाय आपल्या कार्यात तसूभरही खंड पडू दिला नाही. 'बहुजन हिताय' कार्यासाठी त्यांनी जीवन वाहून घेतले. त्यांनी अनेक वाईट चालीरितींना शह दिला. बालविवाह, केशवपन यांसारख्या अत्यंत घातक रूढींना या दांपत्याने आळा घातला. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केले. स्त्रियांना पुनर्विवाहासाठी परवानगी मिळवण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. या दांपत्याला संतती नसल्याने जोतिबांना दुसरा विवाह करण्यासाठी अनेकांनी आग्रह केला. स्वतः सावित्रीबाईंनी परवानगी दिली. तरीपण त्यांनी सडेतोड नकार दिला. काशीबाई नावाची एक स्त्री जीव द्यायला जात होती. तिची अचानक जोतिबा फुलेंची भेट झाली. त्यांनी झाला प्रकार समजून घेतला. त्यांनी त्या स्त्रीला बालहत्या प्रतिबंधक गृहात प्रवेश दिला. सावित्रीबाईंनी तिचे बाळंतपण केले. तेव्हा

काशीबाई म्हणाली, ''तुम्ही माझ्यावर फार मोठे उपकार केले आहेत. माझ्यासारख्या पापी महिलेवर केलेले उपकार मी कधीच विसरू शकत नाही. धन्य आहात आपण दोघे. आपले हे उपकार मी कोणत्या जन्मात फेडू.''

त्यावर सावित्रीबाई समजावणीच्या सुरात म्हणाल्या, ''अगं, तुझे नाव काशी आहे. त्यामुळे तुझ्या नावातच पावित्र्य आहे. तुला पापी कोण म्हणेल.'' पुढे काशीबाईच्या मुलाचे नाव यशवंत ठेवण्यात आले. त्या मुलाला फुले दांपत्याने दत्तक घेऊन त्याचे पालनपोषण केले. त्याला उच्च शिक्षण देऊन डॉक्टर केले. हडपसरच्या ग्यानबा ससाणे यांच्या कुटुंबातील संध्या नावाच्या मुलीशी लग्न करून दिले. काही लोकांनी या आंतरजातीय विवाहाला टोकाचा विरोध केला. पण जोतिबा-सावित्रीबाईंनी याला भीक घातली नाही. असे प्रगत व उदारमतवादी ते कुटुंब होते. जोतीबा आणि सावित्रीबाईंनी समाज सुधारण्याचे कार्य अगदी नेटाने केले. सावित्रीबाई या सत्यशोधक समाजाच्या मुख्य कार्यकर्त्या होत्या.

एकदा जोतिबा फुले घराकडे परतत होते. तेव्हा रस्त्यावर एक भिकारी झोळी फाटल्यामुळे धान्य वेचून घेत होता. जोतिबा फुले त्याच्याजवळ जाऊन त्याची विचारपूस करीत होते. तेव्हा तो भिकारी म्हणाला, ''बाबाजी, या घरातल्या मायमाऊलीने भरपूर धान्य घातले. त्यात माझी विरलेली झोळी फाटली ते धान्य भरत आहे. धन्य ती माऊली; जिने मला मणभर धान्य दिले. मी समाधान पावलो.''

त्याचे बोलणे ऐकून जोतिबांनी आपल्या खांद्यावरचे उपरणे त्याला दिले. त्यावर तो भिकारी सद्गदित होऊन डोळे पुसत बोलला. ''खरंच तुम्ही आमच्यासारख्या गरिबांसाठी देवमाणूस आहात.'' ती धान्य देणारी माऊली म्हणजे सावित्रीबाई होत्या. असे होते आभाळाएवढे मन असणारे फुले दांपत्य. हे जोडपे रात्रंदिवस लोकांच्या भल्यासाठी झटत होते. पण जोतिबांना एके दिवशी अचानक अर्धांगवायूचा झटका आला. त्यात त्यांचे शरीर पंगू झाले. यशवंत आणि सावित्रीबाईंनी हाताच्या फोडासारखे त्यांना खूप जपले. रात्रंदिवस त्यांची शुश्रूषा केली पण त्यांना यश आले नाही. अखेरच्या क्षणी जोतिबांनी सावित्रीबाईंना सांगितले होते. ''माझ्यासाठी दुःख करत बसू नकोस सावित्री. प्रत्येक सजीव हा एक दिवस जाणाराच असतो, म्हणूनच तर तुकोबांनी म्हटले आहे.

जें जें दिसे। ते ते नासे।।

म्हणून दुःख करण्यापेक्षा माझं अपूर्ण राहिलेले कार्य तू पूर्ण कर. त्यात सर्वांचे हीत आहे.''

पतीचा शब्द प्रमाण मानून सावित्रीबाई आयुष्यभर कार्यरत राहिल्या. त्यांनी समाजसेवेबरोबरच साहित्यसेवाही केली आहे. 'काव्यफुले' हा सावित्रीबाईंचा पहिला काव्यसंग्रह होता. त्यात शिक्षण, जातीभेद, निसर्ग, बालकांना उपदेश अशा अनेक विषयांवर कविता आहेत. 'बावनकशी सुबोध रत्नाकर' त्यांचा दुसरा कवितासंग्रह आहे. त्यांनी प्लेगच्या काळातही लोकांना अहोरात्र मदत केली. लोकसेवा करताना त्यांची प्रकृती खालावली. त्यात त्यांचे वयही पासष्टीच्या वर झाले होते. तरीपण अशा अवस्थेत एका प्लेग झालेल्या मुलाला खांद्यावर घेऊन यशवंताच्या दवाखान्यात पोहोचवले. यातच त्यांना प्लेगने घेरले. त्या तापाने फणफणल्या. त्यांनी अनेक सामाजिक, आर्थिक, धार्मिक, संकटावर मात केली पण प्लेगपुढे त्यांना नमते घ्यावे लागले. अशा होत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले... त्यांना मानाचा मुजरा!

**संपर्क : ९५२७८६८१८१**

# देश माझा मी देशाचा

डॉ. प्रतिमा जगताप

देश माझा, मी देशाचा
देश माझा, मी देशाचा
मी भारतीय आहे
अभिमान वाटतो मला
धैर्य अन् शौर्याची
वाचतो एकेक कहाणी
इथल्या शूर वीरांची
गातो गौरव गाणी
स्वातंत्र्यासाठी जे
अमर हुतात्मा झाले.
वाहतो त्यांच्या चरणी
ही कृतज्ञतेची फुले
देशाचे स्वातंत्र्य
हाच माझा श्वास
प्रगतीचे शिखर गाठणे
हाच आहे ध्यास
मार्ग दाविते मजला
भारतीय संविधान
जपून सौहार्दाला
एकतेचे राखीन भान

संपर्क : ९४२२२९२३८४



# सरग दिदा पाणी दे पाणी दे

सुनिल तांबे

२०२४ च्या वर्षारंभी मी हिमाचल प्रदेशात धर्मशाला इथे होतो. आलूबुखार, नाशपती, तुती, खिडक इत्यादी शेकडो झाडांची पानं गळून गेली होती. जांभळाची पानं आणि गवताची पाती कशीबशी तग धरून होती. झेंडू सोडला तर एकही फूल नव्हतं. अधूनमधून जंगली गुलाबाला एखादं फूल यायचं. वसंताच्या आगमनाची वर्दी दिली ती कैथच्या पांढऱ्या शुभ्र फुलांनी. ओढ्याच्या काठावरची कैथची सर्व झाडं पांढरी झाली. मग त्यांना पानं आणि काटे फुटू लागले. मार्च महिन्यात गवताला धुमारे फुटले. पिवळी, पांढरी, निळी, जांभळी लाखो फुलं! त्यापाठोपाठ आलूबुखारला पांढरी फुलं आली. मग नाशपतीला. हजारो जंगली गुलाब फुलू लागले. आंब्याला मोहोर आला. कोकीळकूजन ऐकू येऊ लागलं. बुरांश वा रोडोडेन्ड्रॉनला तांबड्या फुलांचे गुच्छ लागले. या फुलांची चटणी करतात, जॅम आणि सरबत करतात. पपनसाची दोन झाडं होती. एक अंगणात तर एक परसात. त्यांना बहर आला. त्यांचा सुगंध वाऱ्याच्या झुळकांसोबत दरवळायचा. एप्रिल महिन्यात आलूबुखार, कैथ यांना चिमुकली फळं आली. लोकरीचे कपडे कपाटात गेले. सुती कपडे बाहेर आले. सूर्यास्ताची चाहूल लागल्यावर डास आणि अन्य कीटक गुणगुण करू लागले. तळपत्या उन्हात ओढ्याच्या बर्फगार पाण्यात मी अंघोळ करू लागलो.



पिऊ, पिऊ अशी साद एक पक्षी घालू लागला. कधी कधी डोकं उठायचं त्याच्या केकाटण्याने. तो पक्षी झाडांच्या पानांत लपलेला असायचा. कधीही दिसला नाही. सुनील शर्मा आले होते घराची डागडुजी करायला. त्यांना विचारलं, ''हा पक्षी कोणता?'' ते म्हणाले, ''वो तो पानी मांग रहा हैं। खड (ओढा) का पानी वो नही पिता, सिर्फ बारीश का पानी पिता हैं। बारीश नही हैं इसलिये वो जोर जोर से चिल्ला रहा हैं, पानी चाहिये, पानी चाहिये। हमारे गांव मे उसे चोली कहते हैं। उसकी एक कहानी हैं..'' मी कान टवकारले.

''मुलगी आणि सून यांच्या डावंउजवं न करणारी एक सासू होती. दोघींनाही ती कामं वाटून द्यायची. शेत नांगरून थकलेले बैल घरी आले. ते तहानलेले होते. पण त्यांची तहान भागेल एवढं पाणी घरात नव्हतं. मुलगी आणि सून दोघीही थकून गेल्या होत्या. सासू म्हणाली, 'तुम्ही थकला आहात पण बैल तर तहानलेले आहेत. असं करा बैलांना घेऊन जवळच्या ओढ्यावर जा आणि पाणी पाजून परत आणा. मुलगी म्हणाली, 'आम्ही वेगवेगळ्या रस्त्यांनी जातो.'' सून एका बैलाला घेऊन गेली. मुलगी दुसऱ्या रस्त्याने गेली पण एवढी थकली होती की बैलाला पाण्यापर्यंत न नेता घरी परतली. पाणी नाही मिळालं हे बैल थोडाच आईला सांगणार, तिने विचार केला. भुकेजल्या मुलीने जेवण करायला सुरुवात केली. बैलाला मुलीचा राग आला कारण तो पाण्याविना मरायला टेकला होता. त्याने मुलीला शाप दिला, तुला कधीही जमिनीवरचं पाणी पिता येणार नाही, आकाशाकडे पाणी मागत राहशील. बैल मरून गेला आणि मुलीचं रूपांतर चोली पक्षात झालं. ती ओरडू लागली सरग दिदा पाणी दे, पाणी दे (आकाशातल्या भावा पाणी दे).

चोली पक्षी म्हणजे चातक. लहानपणी वडलांनी शिकवलेलं सुभाषित आठवलं.

''एक एव खगो मानी चिरंजीवतु चातकम्। म्रियते वा पिपासार्तो याचते वा पुरंदरम्।।''

चातकासारखा स्वाभिमानी पक्षी नाही, तहानेने व्याकूळ झाला, मरायची वेळ आली तरीही तो इंद्राकडे पाणी मागतो. अन्य कोणत्याही पाण्याला तो शिवत नाही.

शर्माजी म्हणाले, ''गोस्वामी तुलसीदासजी लिखे हैं..''

**''तुलसी के मत चातकही केवल प्रेम पिआस, पिअत स्वाति जल जान जग जाँचत बारह मास''**, म्हणजे चातकालाच प्रेमाची तहान असते. तो केवळ स्वाती नक्षत्रात पडणारे पावसाचे थेंब पितो आणि वर्षभर ढगांचा याचक बनून राहतो.

२४ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर सूर्य स्वाती नक्षत्रात असतो. त्या वेळी परतीचा म्हणजे ईशान्य मॉन्सून सक्रिय असतो आणि चातक तोपावेतो निघून गेलेला असतो उत्तर भारतातून.

चातक पक्ष्याच्या दोन जाती आहेत. एक जात वर्षभर दक्षिण भारतात असते तर दुसरी जात पूर्व आफ्रिका-भारत-पूर्व आफ्रिका असं स्थलांतर करते. चातकाचं आगमन मॉन्सूनच्या वाऱ्यांसोबत होतं. अरबी समुद्र ओलांडून तो उत्तर भारतात येतो की किनारपट्टीने म्हणजे पूर्व आफ्रिका, येमेन, ओमान, बलुचिस्तान, सिंध या मार्गाने ? इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रिमोट सेन्सिंग (आयएसआरओ) आणि वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यांनी इंडियन बायोरिसोर्स नेटवर्क प्रकल्प हाती घेतला आहे. दोन चातक पक्ष्यांच्या पायात प्लॅटफॉर्म ट्रान्समीटर टर्मिनल बसवण्यात आली आहेत. या दोन चातक पक्ष्यांचा माग काढणं त्यामुळे सुकर होणार आहे अशी बातमी २६ ऑगस्ट २०२० रोजी टाइम्स ऑफ इंडियाने दिली होती. मात्र या प्रोजेक्टबाबतची अद्ययावत माहिती इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रिमोट सेन्सिंगच्या संकेत स्थळावर मला मिळाली नाही.

चातक हा कोकीळेसारखा पक्षी आहे. छोटे सातभाई आणि बुलबुल यांच्या घरट्यात तो आपली अंडी घालतो. सावत्र पिलांना हे पक्षी पोटच्या पिलांप्रमाणे वाढवतात आणि पंख फुटले की हे चातक पूर्व

आफ्रिकेला रवाना होतात. आपल्या आईबापांसोबत जातात की स्वयंप्रेरणेने हे कोडंही अजून उलगडलेलं नाही. जून ते ऑगस्ट हा चातक पक्ष्याच्या विणीचा काळ आहे, असं सलीम अली सांगतात. याच काळात छोट्या सातभाई पक्ष्यांचाही विणीचा हंगाम असतो. पावसाळा सुरू होईपर्यंत त्याची जोडी जमते, दुसऱ्या पक्ष्याच्या घरट्यात आपली अंडी घालून दोघेही झाडांवर बागडत असतात.

हौशी पक्षी निरीक्षकांची साक्ष काढायची तर मॉन्सूनच्या आगमनाच्या आधी विशिष्ट प्रदेशात चातकाने हजेरी लावलेली असते. मायग्रंट वॉच या पक्षीनिरीक्षकांच्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर भारतातल्या शेकडो हौशी पक्षीनिरीक्षकांनी कोणत्या दिवशी, कुठे चातक दिसला याच्या नोंदी केल्या. भारतीय हवामानशास्त्र विभागाने मॉन्सूनच्या वाटचालीच्या ज्या तारखा प्रसिद्ध केल्या त्यांच्याशी या निरीक्षणांचा ताळमेळ घालण्यात आला. २००९, २०१०, २०११ आणि २०१२ अशी चार वर्षं हा प्रकल्प राबवण्यात आला. मौशुमी दत्ता या पक्षी निरीक्षक आणि वन्य जीवन संवर्धक आहेत. भारतीय हवामानशास्त्र विभागात त्या कामाला आहेत. २०१० सालात विविध पक्षी निरीक्षकांनी केलेल्या चातकाच्या नोंदी आणि मॉन्सूनच्या आगमनाच्या तारखा यांचा तक्ता त्यांनी तयार केला.

| राज्य | सर्वप्रथम चातक दिसल्याची तारीख | मॉन्सूनच्या आगमनाची तारीख |
|---|---|---|
| ओडीशा | १३ मे २०१० | १३ जून २०१० |
| पश्चिम बंगाल | १७ मे २०१० | १४ जून २०२० |
| गुजरात | ३० मे २०१० | १६ जून २०१० |
| मध्य प्रदेश | १० जून २०१० | ४ जुलै २०१० |
| उत्तराखंड | २७ मे २०१० | ५ जुलै २०१० |
| छत्तीसगड | ६ जून २०१० | ५ जुलै २०१० |
| दिल्ली | ३१ मे २०१० | ५ जुलै २०१० |
| हरियाणा | २२ जून २०१० | ५ जुलै २०१० |
| हिमाचल प्रदेश | २९ जून २०१० | ५ जुलै २०१० |
| राजस्थान | २४ मे २०१० | ६ जुलै २०१० |

२०२४ साली, हिमाचल प्रदेशात मी चातकाचा आवाज ऐकला एप्रिल महिन्यात. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या संकेत स्थळावरील माहितीनुसार हिमाचल प्रदेशात मॉन्सूनच्या आगमानाची तारीख २५ जून आहे मात्र २०२४ साली जून २७-२९ च्या दरम्यान तिथे मॉन्सूनचं आगमन झालं.

चातक मॉन्सूनला घेऊन येत नसतो वा त्याची वर्दीही देत नसतो. मात्र हजारो वर्षं तो मॉन्सूनच्या आधी भारतीय उपखंडात अवतरतो आणि परतीच्या मॉन्सूनसोबत पूर्व आफ्रिकेला रवाना होतो. मॉन्सूनच्या वाऱ्यांवर स्वार होऊन तो प्रवास करतो का? ह्याचा उलगडा हजारो वर्षांत कुणीही केलेला नाही. मात्र इथे आल्यावर म्हणजे सिंध आणि पंजाबपासून ते महाराष्ट्र-कर्नाटकापर्यंत तो कळवळून मॉन्सूनला साद घालत असतो-सरग दिदा पाणी दे, पाणी दे. महाकवी कालिदास, गोस्वामी तुलसीदास, संत कबीर आणि अन्य कवींच्या रचनांमध्ये चातक म्हणूनच येतो. स्वाभिमान, प्रेम, सन्मार्ग इत्यादी गुणांचं प्रतीक बनतो.

संदर्भ : द बुक ऑफ इंडियन बर्ड-सलीम अली (द बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी-१९४१)

**संपर्क : ९९८७०६३६७०**



# संयमाची गोड फळं.

हबीब भंडारे

झाडं शिकली स्वत:हून
वादळाशी तोंड द्यायला,
सोसाट्याचा वारा
पाऊस गारा झेलायला
अभ्यासू पक्षी लावतात
मोसमांचे अचूक तर्क,
कष्टाच्या गोड फळात
असतो अनुभवाचा अर्क
संयमाचे खूप फायदे
घेतात झाडं समजून,
जीवसृष्टीचे महत्त्व
घेतात पाखरं उमजून
आवडीनं मधमाशा
करतात मध गोळा,
गायींच्या गळ्यात
ममतेच्या घुंगूरमाळा
मिळवत राहावे ज्ञान
अभ्यासू व्हावी वाणी,
एकाच मातीत जन्मते
अनेक जन्मांची कहाणी.

संपर्क : ७५०७३२८३८३



# वाचणारी डोकी हवीत!

रामदास केदार

**प्रवेश पहिला**

(शांत वातावरण आहे... घराचा कोपऱ्यात पुस्तकांने गच्च भरलेले बंद कपाट. कपाटाला जाळ्या लागलेल्या आहेत. लेखक मोडक्या लाकडी खुर्चीवर शांत विचार करत बसलेला आहे. लेखकाच्या कानावर आवाज पडतो)

**आवाज** : मला उघडा, मला उघडा

**लेखक** : (कपाटाकडे बघतो) कोण? कोण? कुणाचा आवाज?

**कपाट** : मी मी बोलतोय.

**लेखक** : मी म्हणजे नक्की कोण?

**कपाट** : मी कपाट बोलतोय?

**लेखक** : (हसतो) कपाट?

**कपाट** : (मोठा आवाज) यात हसण्यासारखं काय आहे? कुलपाच्या बेडीत मला बंद करून टाकलंत.

**लेखक** : मग काय झालं?

**कपाट** : बघा, बघा. आतली पुस्तके रुसलीत तुमच्यावर, जीव गुदमरतोय त्यांचा!

**लेखक** : (खुर्चीवरून उठतो, कुलपाची चावी हातात घेऊन कपाट उघडतो. कुरकुर असा कपाटाचा आवाज येतो. दोन-तीन झुरळे बाहेर पडतात. जाळ्या झटकतो.)

**कपाट** : बघा, बघा आमच्या नशिबी जाळ्या अन् झुरळं. तुम्ही मात्र लेखकराव...?
(सगळी पुस्तके खदखदा हसू लागतात.)
अहो लेखकराव, बघा बघा किती आनंद झाला पुस्तकांना!
(पुस्तके अजून हसू लागतात.)

**लेखक** : कसला आनंद?

**कपाट** : आजवर ती बंदिस्त होती. तुरुंगातल्या कैद्यांसारखी, तुम्हीच म्हणत असता की, पुस्तकांत अनेक पात्रं असतात. ती पात्रं जिवंत असतात. मग अशी तुरुंगातल्या कैद्यांसारखी कोंडून का ठेवायची? आज तुम्ही कपाट उघडलं त्यांच्यावरची जाळी आणि धूळ झटकलीत. म्हणून पुस्तकांना आनंद झाला. खरे आहे की नाही पुस्तकांनो?

**पुस्तके** : (सगळेच मोठ्या आवाजात) हो, अगदी खरं आहे. आम्ही जिवंत असूनही कपाटात मेल्यासारखेच, अशा बंदिस्त कपाटात आमचा श्वास गुदमरतोय.

**लेखक** : (पुस्तकांवर हात फिरवतो) कोण बोलतंय असं?

**पुस्तक** : मी कथा, मी कविता, मी कादंबरी, मी ललित, मी विचारवंत मी इतिहास, मी भूगोल.

**लेखक** : (हातात पुस्तके घेऊन त्यांची पाने उलगडतो) तुम्ही तुमचा परिचय दिलात. तुम्हांला हवं तरी काय?

**पहिले पुस्तक** : मला हातांचा स्पर्श हवा.

**दुसरे पुस्तक** : मला मुलांची मैत्री हवी.

**तिसरे पुस्तक** : आम्हांला वाचणारी डोकी हवीत.

**चौथे पुस्तक** : आमची जागा बंद कपाटात नको.

**पाचवे पुस्तक** : तुमच्या सोबत राहू, चांगले ज्ञान देऊ.

**सहावे पुस्तक** : तुम्ही तुमच्या लेकरांसारखं आमच्यावर प्रेम करा. प्रेम केलंत की, पानावरची चित्रंसुद्धा तुमच्याशी बोलू लागतील?

**लेखक** : तुम्हांला काय म्हणायचं ते कळलं...
(चार-पाच मुलं येतात.)
या, मुलांनो या, पुस्तकांशी मैत्री करा, पुस्तकांशी बोला, चित्रांशी गप्पा मारा, पुस्तकांना खूप आनंद होईल. लेखक म्हणून मलापण आनंद होईल.

**पुस्तके** : (सगळे हसू लागतात. मुलं हातात पुस्तके घेऊन धूम ठोकतात.)

**कपाट** : मीही मोकळा झालो, अन् पुस्तकांचा श्वासही मोकळा झाला. लेखकराव... आता वाचणारी डोकी हवीत. वाचणारी डोकी हवीत.

**संपर्क : ९८५०३६७१८५**

वसुंधरा भोपळे

# कुतूहल

'किशोर' मित्रांनो,
'किशोर' डिसेंबर २०२४ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ जानेवारी २०२५ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

संपर्क : ७३८७४३२९४१

**१) खालीलपैकी कोणत्या आदिवासी स्वातंत्र्य सेनानीच्या १५० व्या जयंतीनिमित्त आदरांजली म्हणून १५ नोव्हेंबर २०२४ या राष्ट्रीय आदिवासी गौरव दिनादिवशी टपाल खात्याने टपाल तिकीट जारी केले?**

१) कान्हो संथाल २) भगवान बिरसा मुंडा
३) ताना भगत ४) कजार सिंग

**२) भारताचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून कोणी पदभार स्वीकारला?**

१) न्यायमूर्ती के.जी.बाळकृष्ण
२) न्यायमूर्ती संजीव खन्ना
३) न्यायमूर्ती डी.वाय.चंद्रचूड
४) न्यायमूर्ती रंजन गोगोई

**३) भारतातील शासन संस्थेच्या तीन शाखांमध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश होत नाही?**

१) कायदे मंडळ २) प्रजा मंडळ
३) कार्यकारी मंडळ ४) न्याय मंडळ

**४) 'भितरकणीका राष्ट्रीय उद्यान' कोणत्या राज्यात आहे?**

१) छत्तीसगड २) मेघालय
३) ओडिशा ४) पश्चिम बंगाल

**५) खालीलपैकी कोणाची जयंती 'राष्ट्रीय एकता दिवस' म्हणून साजरी केली जाते?**

१) महात्मा गांधी
२) सुभाषचंद्र बोस
३) सरदार वल्लभभाई पटेल
४) खान अब्दुल गफार खान

**६) गरुड शक्ती : भारत आणि इंडोनेशिया : वज्र प्रहार: भारत आणि...?**

१) अमेरिका २) दक्षिण आफ्रिका
३) मलेशिया ४) व्हिएतनाम

**७) अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून कोणाची निवड झाली आहे?**

१) कमला हॅरिस २) जो बायडेन
३) डोनाल्ड ट्रंप ४) बराक ओबामा

**८) राजस्थानमधील जयपूरचे महाराजा सवाई जयसिंग यांनी भारतात एकूण पाच ठिकाणी 'जंतर मंतर' या खगोलीय वेधशाळा बांधल्या. खालीलपैकी कोणत्या ठिकाणी त्यांनी 'जंतर मंतर' ही वेधशाळा बांधली नाही?**

१) उज्जैन २) वाराणसी
३) मथुरा ४) आग्रा

**९) ५५ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव खालीलपैकी कोणत्या राज्यात आयोजित करण्यात आला आहे?**

१) गोवा २) केरळ
३) उत्तराखंड ४) महाराष्ट्र

**१०) राष्ट्रीय आयुर्वेद दिन : धन्वंतरी : राष्ट्रीय कर्करोग जन जागृती दिन ?**

१) सर जगदीशचंद्र बोस २) मेरी क्युरी
३) चंद्रशेखर ४) चरक

**११) नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. महाराष्ट्राच्या विधानसभेची सदस्य संख्या किती आहे?**

१) ७८ २) २८८
३) ५५२ ४) २३८

**१२) खालीलपैकी चुकीचे विधान ओळखा?**

१)साहित्य अकादमीच्या वतीने दरवर्षी बालसाहित्य पुरस्कार दिले जातात.

२) ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे यांच्या 'समशेर आणि भूतबंगला' या कादंबरीला २०२४ चा मराठी भाषेतील बालसाहित्याचा पुरस्कार मिळाला आहे.

३) यापूर्वी भारत सासणे यांनी २०२२ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले आहे.

४) वरील सर्व विधाने बरोबर आहेत.

**१३) भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (CAG) या पदावर नोव्हेंबर २०२४ मध्ये कोणाची नियुक्ती करण्यात आली आहे?**

१) गिरीशचंद्र मुर्मू २) के. संजय मूर्ती

३) राजीव महर्षी ४) विनोद राय

**१४) बिहारमधील राजगीर येथे झालेल्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी २०२४ मध्ये भारतीय महिला संघाने कोणत्या देशाचा पराभव करून तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावले?**

१) चीन २) दक्षिण कोरिया

३) जपान ४) मलेशिया

**१५) भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर एकूण किती राज्ये आहेत?**

१) चार २) पाच

३) सहा ४) तीन

---

## डिसेंबर २०२४ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (डिसेंबर २०२४) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) २ | २) १ | ३) १ | ४) ४ | ५) ३ |
| ६) १ | ७) १ | ८) १ | ९) २ | १०) ४ |
| ११) २ | १२) २ | १३) १ | १४) ३ | १५) ४ |

## कुतूहल (डिसेंबर २०२४) यशस्वी स्पर्धक

**सातारा –** कु. सुवीर फडे

**वर्धा –** कु.श्रावणी सरदार, कु.जान्हवी प्रजापती, कु.श्रुतिका सरदार, कु. स्नेहल सरदार, कु. आदर्श चरडे, कु. दिलीप होले

**अकोला –** कु. कामरान खान, कु.आरिफ खान

## चित्रकोडे (ऑक्टोबर–नोव्हेंबर) यशस्वी स्पर्धक

**पुणे –** कु. तनिष्का जाधव

**कोल्हापूर –** कु. प्रांजल पाटील

**नागपूर –** कु. नीरजा कुलकर्णी

**सातारा –** कु. सुवीर फडे

**हिंगोली –** कु. अभिरूप कोरडे, कु. श्रीरूप कोरडे, कु. वरद पती

**सांगली –** कु. शांभवी कुलकर्णी

**सोलापूर –** कु. शनय भोसले

**वर्धा –** कु. स्वस्तिका चरडे, कु.आराध्या कान्होलकर, कु.अनुष्का देशमुख, कु. भक्ती कनेर

**अहिल्यानगर –** कु. गोकुळ गोफणे, कु. वैष्णवी मोहिते, कु. विहान सातपुते, कु.समृद्धी हासे, कु.संस्कृती मोहिते, कु. साईराज मोहिते, कु.अक्षरा हासे

**बीड –** कु. आरोही अरबुणे

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



एके दिवशी मी घराच्या जवळ माझ्या बहिणीसोबत खेळत होतो. तेव्हा दिदीला आमच्या बागेत एक छोटेसे कुत्र्याचे पिल्ले सापडले. आम्ही दोघांनी त्याला एक छोटसं घर बांधून दिले. आम्ही सगळ्यांनी त्याचे नाव टॉमी ठेवले. आम्ही त्याला दररोज दूध आणि पोळी खाऊ घालत होतो. त्या दिवसापासून टॉमी आमचा मित्र झाला. व तो आमच्यासोबत उड्या मारत खेळायचा. त्याला आम्ही पावसाळ्यात खूप जपले कारण तो सारखा रस्त्यावर जात होता. टॉमीचा आवाज खूप छान होता. तो आमच्यासोबत रोज फिरायला यायचा. त्याचा रंग काळा आणि पांढरा होता. आणि डोळे खूप घारे होते. दुसरे कुत्रे टॉमीला खूप त्रास द्यायचे पण आम्ही त्यांना पळवून लावले. त्याची एका मांजराशी मैत्री होती. ते दोघे खूप खेळत होते. ते कधी कुणाला चावले नाही. तो खूप गुबगुबीत होता. तो मला बघितल्यावर खूप खूश व्हायचा. थोड्या महिन्यानंतर तो मोठा झाला. आम्ही त्याला आमच्या घरासमोरच्या जागेत ठेवले. मला टॉमी खूप आवडतो.

**कु. आरुष गौरव बेंद्रे**
(इ.६वी), इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल,
ॲक्टिवेट जिम समोर, सोलापूर–४१३००४.



मी एकदा आमच्या शेतात चिंचा आणायला गेले होते. मला शेताच्या बांधावर एक कबुतराचे पिल्लू दिसले. त्याच्या पंखाला लागले होते. त्यातून खूप रक्त वाहत होते. माझ्याकडे एक कापड होते. मी त्या कबुतराच्या पिल्लाला त्याच्यात गुंडाळले व घरी घेऊन आले.

मी घरी आल्यावर त्याचा पंख मी डेटॉलने स्वच्छ धुतला व त्या पंखाला मलमपट्टी केली. त्याला मी पाणी व ज्वारीचे दाणे ठेवले व कबुतराच्या पिल्लाने ते पटपट खाल्ले. माझ्याकडे एक मोठा बॉक्स होता. त्याती मी कापूस टाकला व त्यात पिल्लू ठेवले. एका महिन्याने ते पिल्लू मोठे झाले व त्याची जखम भरली. मग मी त्या पिल्लाला आभाळात भरारी मारण्यासाठी सोडून दिले.

**कु. दिव्या तानाजी ओझरकर**
जि.प.प्राथमिक शाळा, बौर, ता. मावळ–४१०४०५.



घरातली कामे आवरून जरा घाईत मी शाळेत चालले होते. तितक्यात रस्त्यावर एक भिकारी भीक मागत हात पुढे करून उभा होता. मी लगेच जवळच्या दुकानात जाऊन बिस्किट पुडा आणून त्याला दिला. तो आनंदी झाला. मी शाळेत पोहचलो मला सरांनी उशीर का झाला विचारले. मी सरांना सर्व हकीगत सांगितली. सरांनी मला शाबासकी दिली. मला खूप आनंद झाला.

**कु. माहेश्वरी मोरे**
जि.प.प्राथमिक शाळा, पुरी ता. चांदवड,
जि. नाशिक ४२३१०१



रविवारचा दिवस हा माझा आवडीचा दिवस होता. मी लहान असताना एका रविवारी मी सायकल फिरवताना मला एक मोबाईल सापडला. मी तो घेतला आणि काही लोकांना विचारले की, ''हा मोबाईल तुमचा आहे का काका?'' सगळ्या लोकांनी नाही म्हटले. मग घरी आल्यावर त्या मोबाईलवर एक फोन आला.त्या काकांनी विचारले की, ''हा मोबाईल तुम्हांला कोठे सापडला?'' मी सगळी गोष्ट सांगितली. नंतर मी त्यांना मोबाईल दिला. त्यांनी मला धन्यवाद दिले. मीपण त्यांना धन्यवाद म्हटले. तुम्हीदेखील असेच लोकांना मदत करत रहा.

**कु. आदित्य होले**
इ.७वी, जि.प.उच्च प्राथमिक शाळा, लहान आर्वी,
ता. आष्टी, जि. वर्धा-४४२२०२.



एके दिवशी मी शाळेत जात होते. तेव्हा रस्त्यावर एक म्हातारी आजी बसलेली दिसली. मी तिच्या जवळ गेले. ती मला म्हणाली, ''तुझ्या जवळ काही खायला आहे का, किंवा पाणी आहे का?'' मी म्हणाले, ''आहे.'' मी तिला माझा जेवणाचा डबा व पाण्याची बाटली दिली. मी तिला माझ्या हाताने पोळी व भाजीचा घास भरवला. तिने मला खूप आशीर्वाद दिले व माझे कौतुक केले.

**कु. अनुष्का संदीप पानसरे**
जि. प. प्राथमिक शाळा, पुरी,
केंद्र - सोग्रस, ता. चांदवड,
जि. नाशिक-४२३१०१.

# उमलती प्रतिभा

## बाबा

बाबांची कठोर असते शिस्त
पण मन असते अगदी मस्त,
बाबा काम करण्यात असतात मग्न
ते कधीही होत नाहीत दवाखान्याचे रुग्ण,
बाबा कधीच नसतात सुस्त
दररोज कामात असतात व्यस्त,
काढले जाते नेहमी बाबा आणि मुलाचे चित्र
त्यात ते असतात एकमेकांचे मित्र,
बाबा म्हणजे प्रेमाचा सागर,
त्यात उसळत असते आनंदाच्या लाटांची लहर.

कु. आनंदी प्रवीण नानंदकर
श्रीकिशन सोमणी शाळा,
लातूर - ४१३५१२.

## सावित्रीचे शिक्षण

शिकवा आमच्या पोरीला दादा
शिकवा आमच्या पोरीला
शाळेचे जग पाहू चला हो,
नवीन मैत्री करू चला
सावित्री बाईंचे नाव घेऊन
आपण समोर जाऊ चला
शिक्षकांच्या मदतीने ज्ञान घेऊन
त्याचे उपयोग करू चला
जीवनाचे खरे महत्त्व कळून
जीवन सुंदर करू चला
त्याच्यात असते शिक्षणाची गरज
ते आपण शिकू चला

कु. बुशरा अकबर शेख
इ. ७वी, जि.प. उच्च प्राथ.केंद्र शाळा,
कारवाफा, ता.धानोर,
जि.गडचिरोली-४४२६०६



कु. पवित्रा मधुकर भोईर
जि.प.प्रा. शाळा सोनावळे, ता.मुरबाड, जि.ठाणे-४२१४०२.



कु. सिद्धी मनिष खेरुडकर
इ. सातवी, जि.प.केंद्र शाळा (मानवत)
ता. मानवत, जि. परभणी-४३१५०५.

# शूर मुलगी आणि तिचे मित्र

एक शहर होतं. तिथे एक इमारत होती. दररोज इमारतीतील मुले खाली खेळायला येत असत. एके दिवशी संध्याकाळी मुले नेहमीप्रमाणे खाली खेळत होती आणि अचानक एक कोल्हा त्या इमारतीत शिरला. मुले खेळात दंग होती. तेवढ्यात प्रांजलला तो कोल्हा दिसला. तिने लगेच आपल्या मित्रांना सावध केलं आणि दुसरीकडे पळून जाण्यास सांगितले. पण ती स्वतः मात्र तिथेच थांबली आणि कोल्ह्याच्या हालचालींकडे लक्ष ठेवत राहिली.

तिने आईने सांगितलेल्या गोष्टी ऐकल्या होत्या की, जंगली जनावरे आगीला घाबरतात. त्या क्षणी तिने एक लाकूड घेऊन त्याची मशाल बनवली आणि कोल्ह्याच्या दिशेने न घाबरता चालू लागली. इतर सगळी मुले घाबरून सैरावैरा पळू लागली. कोणी घरात जाऊन लपून बसले तर कोणी घाबरून रडू लागले.

प्रांजलने मात्र कोल्ह्याला पळवून लावायचे ठरवले. तिच्या हातातील मशाल पाहून कोल्हा मागे मागे जाऊ लागला आणि शेवटी मशालीच्या आगीला घाबरून कोल्हा पळून गेला. प्रांजलने आपल्या मित्रांना बोलावले व कोल्हा गेल्याचे सांगितले. सगळ्या मित्रांना खूप आनंद झाला. सगळ्या मित्रांनी आनंदाने प्रांजलला उचलून घेतले. तिच्या धाडसाचे व शूरपणाचे सर्वांनी कौतुक केले. तेवढ्यात प्रांजलच्या कानावर आईचा आवाज आला, ''प्रांजू बाळा, ऊठ आता; सकाळ झाली.'' प्रांजल म्हणाली, ''काय गं आई, आत्ताच तर मी कोल्ह्याला पळवून लावलं.'' असं म्हणत तिने डोळे उघडले. बघते तर काय, ती तर अंथरुणावर झोपली होती! ती म्हणाली, ''अरेच्चा म्हणजे तो कोल्हा, ती मुलं, ती मशाल ! हे सगळं स्वप्न होतं तर...''

हे ऐकून आई म्हणाली, ''अगं, कोल्हा काय, मशाल काय, हे काय बडबडते आहेस?'' त्यावर प्रांजलने स्वप्नात घडलेली गोष्ट आईला सांगितली. आई म्हणाली, ''शूर माझी बाळ ती!'' असे म्हणून आईने प्रांजलला प्रेमाने जवळ घेतले.

**कु. प्रांजल सावंत,** इ. तिसरी (लोटस),
डी.इ.एस प्रायमरी स्कूल, टिळक रोड, पुणे-४११००२.



**कु. श्रावणी राहुल अंजीकर**
इ. ७ वी, श्री समर्थ विद्यालय, मु.पो. अंजी (नृसिंह),
ता. घाटंजी, जि. यवतमाळ-४४५३०१.



**कु. आराध्या मंगेश परदेशी**
इ.४ थी, जिल्हा परिषद प्रा.शाळा, हट्टी,
ता. चांदवड, जि. नाशिक-४२३११७.


कुणीतरी आहे तिथं
घनश्याम देशमुख
संपर्क : ९८२३४१३६२९
दोघे आवाजाच्या दिशेने पुढे आले.
आवाज बंद झालाय...पण हे काय?
एवढी झाडे तोडून इथे कशाला ठेवलीत?
आणि या दोन दिवसांत तोडलेली झाडं आहेत ही... तीही या जंगलातील..
म्हणजे या हवेलीतले भूत झाडं तोडतं की काय
नाही! हे काम एका भुताचं नाही. तर बरीच भुतं त्याला मदत करीत आहेत. कळलं तुला?
ते पुढे दुसऱ्या दालनात आले...
चंदू, आता आपल्याला या झाडांची कत्तल करणाऱ्या भुतांची टोळी शोधायला हवी.
त्या तिकडे प्रकाश दिसतोय तिथं बघूया.
पण जरा सावध राहायला हवं, आपण या हवेलीत घुसलो ते त्यांना कळलं असावं.


कसं कळलं त्यांना? मग ते पळून गेले की काय?
नाही. ते इथंच आहेत. आणि आपल्या मागावर आहेत. कळेलच तुला.
अगदी बरोबर बोललात! मुलांनो, आम्ही इथेच आहोत. खूप बुद्धिमान आणि शूर आहात तुम्ही.
मित्रा तू ? इथं?
हो, परकोटा जवळील गुप्त रस्त्यातून मी या हवेलीत आलो, वाटलं तुम्ही घाबरून निघून जाल.
त्यामुळेच तर मला कळलं की हवेलीत भुतं नाहीत.
तर हवेलीत, काहीतरी चोरटी कामं होतात. आणि त्यात तूपण सहभागी आहेस. आम्ही हवेलीत आलोय...
हे पण तुला माहीत होतं. जंगलातील दुर्मीळ झाडं तोडून तुम्ही ते शहरात विकता. आणि गावातल्या लोकांना भुताची भीती दाखवता.
म्हणजे तुला सगळं माहीत झालंय!
क्रमशः

# बारा महिने

**संगीता माने**



## जानेवारी

आला आला पहिला महिना
आला बघा जानेवारी
चला मुलांनो चला लावूया महिन्यांची क्रमवारी...



## फेब्रुवारी

हातामध्ये हात घालुनिया
नाचतोय फेब्रुवारी



## मार्च एप्रिल मे

मार्च, एप्रिल, मे उन्हाळ्याची
आली स्वारी बघ दारी
आंबा फणस जांभळे खाऊ रानमेवा भारीभारी
चला मुलांनो चला लावूया महिन्यांची क्रमवारी...



## जून जुलै ऑगस्ट सप्टेंबर

जून, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर पावसाळा
झरती झरझर पावसाच्या ढगांतून शुभ्र धारा
झेलू पाऊस
धागडधिंगा घालूया आपण सारी
चला मुलांनो चला लावूया महिन्यांची क्रमवारी ...



ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरचा हिवाळा
रजईमध्ये गुडूप झोपू बंद करूनिया चाळा
आला आला तो फिरून आला नववर्षी जानेवारी
चला मुलांनो चला लावूया महिन्यांची क्रमवारी ...

## ऑक्टोबर नोव्हेंबर डिसेंबर

संपर्क : ७०५७८०८४४८

# play & enjoy

Chitrarekha Jadhav

Oh balloon, don't feel shy
Play with me and enjoy
Touch my eyes and touch my nose.
As I click, you take a nice pose

Dance on my shoulder and dance on my hand
Now we shall shake our hands

Jump on my ears and head
Now we are good friends,
Let’s Play hide and seek on my back and neck
I will give you a cake.
Run on my stomach and let us fly.
We both will jump and touch the skies

Just wait  I will show you some magic
How Fingers and toes can play some tricks.

**Contact : 9421170695**



# Crying Crops

Varsha Dhoke

Gulab came from school. She put her bag on her study table and then went to the washroom to get fresh. While washing her feet, she heard her mother's voice,

"Gulab, hurry up. Come to the kitchen. I am roasting groundnuts. Hurry up."

Gulab washed her hands and feet. Changed her school uniform. Hanged it on her clothes stand and went to her mother in the kitchen.

"How was your day Gulab? What did you learn today in the school?"

This was a daily routine, followed by Gulab and her mother. After returning from school, Gulab and her mother would talk about each other's day. Gulab always talked enthusiastically about her teacher, friends and what she learnt in school.

Today also, there was something new for mother to tell.



Gulab told mother, “Aai, today our teacher taught us about climate change. Teacher showed us some pictures of a crowd of people, metropolitan cities, factories, forest that we cut for roads and industrial purposes. We felt a little uneasy to see all those pictures.”

Mother asked, “Then, what did your teacher tell you further ?”

Gulab replied, “Teacher told us that all the pictures indicated the reasons of climate change. Then she explained how they all affect our climate.”

In the mean time groundnuts were ready. Mother put them in two dishes. Added some jaggery in both plates.



“Aai, teacher has given us homework.. We have to discuss with elders in the family on the topic, 'How climate change affects farmlands and in what ways?”

At the same time, Gulab’s grandfather returned from the farm. He got fresh, and then called out for Gulab.

As mother heard his voice, she asked Gulab, “Why not you ask aappa regarding this? He can explain you better. Take these plates for both of you.”

Gulab smiled happily, “I was thinking same about talking to Aappa.”

Gulab took the plates and came to the drawing room. Aappa was waiting for her.

She sat near him. He patted her head with love. She offered a plate to him. They both started eating groundnuts.

Gulab told aappa how her teacher explained reasons of climate change in the class.

She told her grandfather about the topic given by her teacher as homework. Gulab was quite sure that her Aappa would guide her properly.

Gulab asked him, “Aappa, do the changes in climate and environment affect agriculture? Can you explain how these changes occur?”

Grandfather smiled, he took a handful of groundnuts and said,

“Yes Gulab, changes in climate affect our farming severely. I will tell you how this happens. But tell me first, do u know reasons of our changing climate?”

“Yes Aappa.” and then Gulab repeated the reasons her teacher had told in the classroom.

Aappa patted her again, “You are a clever girl Gulab. You got it clearly. Growing population, rapid urbanization, vast use of construction material like cement, industrialization, vehicle growth pollutes our mother nature. For our need, we cut down forests. It affects rain directly. You know, in India most of the farming depends on monsoon rain water. Due to changes in arriving time of the rain, schedule of planting crops mess up. Since two-three decades, I have been observing that rain timings and the amount also has changed. So we farmers are afraid of growing crops which are totally depend on rain. Sometimes , when crops need, it rains irregularly. Sometimes the downpour be for the harvest spoils the crop. Due to insufficient rain, the level of well water decreases.”

“Ohh!”, Gulab exclaimed. She was listening to Aappa silently.

“Gulab, do you remember, about Dinu uncle? How frustrated he was last October? Because of Unseasonal rain, his orange crop was destroyed.”

“Yes Aappa. Dinu uncle was so disheartened at that time.”

At the same time, mother came from the kitchen.

She asked Gulab, “Did you get sufficient information related to your homework?”

“Yes Aai. Now I can complete it in a good way.”

Gulab sat on her table. Took out her homework copy and started jotting, ‘Effects of climate change on the farm...’

**Contact : 9850731984**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Help the boy reach his birthday gift.**



**Which two are the different ?**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ जानेवारी २०२५.

३) कोड्याचे उत्तर फेब्रुवारी २०२५ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal Regd.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.12.2024, Date of Posting - 27th & 28th December 2024 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)







कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा




लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित 'निवडक किशोर'चे १४ खंड




किंमत प्रत्येकी
₹ १६३ /-
(५०% सूट)




वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-

किशोर


**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग,
पुणे - ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० - २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,